# पंचायती राज समिती

## (२०१३-२०१४)

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या गडचिरोली जिल्हा परिषदेचा सन २००४-२००५ व ठाणे जिल्हा परिषदेचा सन २००५-२००६ च्या लेख्यावरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत**

# पंधरावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक १९ डिसेंबर, २०१३ रोजी विधानसभेस/
विधानपरिषदेस सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, नागपूर

२०१३

# पंचायती राज समिती

## (२०१३-२०१४)

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या गडचिरोली जिल्हा परिषदेचा**
**सन २००४-२००५ व  ठाणे  जिल्हा परिषदेचा  सन २००५-२००६**
**च्या लेख्यावरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन**
**अहवालातील परिच्छेदाबाबत**

# पंधरावा अहवाल

पंचायती राज समिती
(२०१३-२०१४)

**समिती प्रमुख**

१. श्री.जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५. श्री.विजयराव खडसे, वि.स.स.
६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७. श्री.दिलीप माने, वि.स.स.
८. श्री.भारत भालके, वि.स.स.
९. श्री.बाबासाहेब पाटील, वि.स.स.
१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
११. श्री.राजेंद्र शिंगणे, वि.स.स.
१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.
१३. श्री.संजय भेगडे, वि.स.स.
१४. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
१५. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
१६. श्री. संजय राठोड, वि.स.स.
१७. श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१८. ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.
१९. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स
२०. श्री.राजाराम ओझरे, वि.स.स.
२१. श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.
२३. श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२५. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित**

२६. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
२७. श्री.सुरेश हळवणकर, वि.स.स.
२८. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.विलास आठवले, उप सचिव
३) श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
४) श्री.नागनाथ थिटे, अवर सचिव
५) श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी
६) श्री.दिनकर कांबळे, कक्ष अधिकारी

**पंचायती राज समिती**
**(२०१२-२०१३)**

## समिती प्रमुख

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

### सदस्य

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.विजय खडसे, वि.स.स.

६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री.दिलीप माने, वि.स.स.

८. श्री.भारत भालके, वि.स.स.

९. श्री.उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

१५. ** श्री.जयकुमार रावल, वि.स.स.

१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

१९. श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.

२०. श्री. प्रकाश भोईर, वि.स.स.

२१. *श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.

२३. *श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.

२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

### निमंत्रित

२६.श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री.भाऊसाहेब कांबळे, अतिरिक्त सचिव

श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

*सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली व श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागांवर श्री.एम.एम.शेख, वि.प.स. व श्री.दिपक साळुंखे, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी पंचायती राज समितीचे समिती सदस्य म्हणून मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी नामनियुक्ती केली आहे.

** श्री.जयकुमार रावल, वि.स.स. यांचे सदस्यत्व सभागृहाने दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत निलंबित केले आहे.

## प्रस्तावना

मी पंचायती राज समितीचा "समिती प्रमुख" या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा पंधरावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१३-२०१४ करिता समिती दिनांक २५ सप्टेंबर, २०१३ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात

आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसूली लेखे यांच्या परिक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००४-२००५ व सन २००५-२००६ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २०१२-२०१३ साठी गठीत झालेल्या समितीने गडचिरोली व ठाणे जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली.

समितीने गडचिरोली जिल्हा परिषदेस दिनांक २९, ३० व ३१ ऑगस्ट, २०१२ रोजी भेट देऊन श्री.किरण गणेश कोवे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.रा.सो.महाले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, गडचिरोली जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने ठाणे जिल्हा परिषदेस दिनांक १६, १७, १८ व १९ ऑक्टोबर, २०१२ रोजी भेट देवून श्री.किरण कुरुंदकर, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.संजय पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१२-२०१३ करिता गठीत झालेल्या समितीने गडचिरोली व ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्यालेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ९ व १० जुलै, २०१३ रोजी जिल्हा परिषद, गडचिरोली तसेच दिनांक २६ व २७ जून, २०१३ व दिनांक १२ नोव्हेंबर, २०१३ रोजी जिल्हा परिषद, ठाणे संदर्भात मंत्रालयीन विभागाच्या सचिवांची/प्रतीनीधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीच्या वेळी श्री.ज.स.सहारिया, अतिरिक्त मुख्य सचिव, श्री.स्वाधीन क्षेत्रिय, अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल, श्री.टी.सी.बेंजामिन, अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, डॉ.सुधीर गोयल, अप्पर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग (कृषी व पणन), श्री.एस.एस.संधु, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, श्री.उज्जल उके, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग (रोहयो), श्री.प्रवीण परदेशी, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, श्री.एस.के.मुखर्जी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.अनिल डिग्गीकर, सचिव, कृषी व पदुम विभाग, श्री.दि.ग.मोरे, सह सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.ना.ना.रौराळे, सह सचिव, शालेय शिक्षण

विभाग, श्री.गिरीष भालेराव, सह संचालक (रा.ग्रा.आ.अ.), सार्वजनिक आरोग्य विभाग, (१४) श्री.एस.व्ही.देशपांडे, सह संचालक (अभियांत्रिकी), जीएसडीए, पुणे, डॉ.मल्लीनाथ कळशेट्टी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.रामचंद्र शं.जाधव, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.गो.ग.आल्हाट, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री.एकनाथ मोरे, उप सचिव, श्री.न.म.शिंदे, उप सचिव, श्री.द.चि.सुर्यवंशी, मुख्य अधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गडचिरोली, श्री.एस.बी.पेजलवार, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली, श्री.एस.पी.कुंभार, कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, गडचिरोली, श्री.शेखर गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, श्री.रविंद्र शिंदे, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, श्री.संजय पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, श्री.अशोक पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, श्रीमती रुपा राऊळ-गिरासे,कार्यकारी अभियंता, जि.प. ठाणे, श्री.पी.एल.कवाते, शिक्षणाधिकारी, ठाणे, श्रीमती सलीमा तडवी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी,तसेच जिल्हा परिषद गडचिरोली व ठाणे यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबाबत समिती त्यांची आभारी आहे.तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनीही साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून समितीला केलेल्या सहकार्यबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीच्या कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिली आहे.

लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या गडचिरोली व ठाणे जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी या अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१३-२०१४ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक .... डिसेंबर, २०१३ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेवून संमत केला.

विधान भवन,
नागपूर,
दिनांक ... डिसेंबर, २०१३

जयप्रकाश दांडेगावकर
समिती प्रमुख
पंचायती राज समिती

## अनुक्रमणिका

| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| | | **प्रकरण एक** | | |
| | | **जिल्हा परिषद, गडचिरोली** | | |
| १ | १. | साहित्य अप्राप्त असताना खोट्या प्रमाणकाव्दारे देयक मंजूर करणे | ३.८३ | |
| | | **प्रकरण दोन** | | |
| | | **जिल्हा परिषद, ठाणे** | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | २. | तरतूद नसताना केलेल्या नियमबाह्य खर्चाबाबत | ३.७८ | |
| | ३. | दुधाळ जनावरांचे नियमबाह्यरित्या वाटप | ३.९३४ | |
| | ४. | बांधकाम विभागाशी संबधित प्रमाणक क्रमांक ३१२ दिनांक २३/६/२००६ च्या अनुषंगाने झालेल्या प्रदानातील अपहाराबाबत | ४.४४ | |
| | | **परिशिष्ट** | | |
| | | समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | | |

प्रकरण एक

## गडचिरोली जिल्हा परिषद

### १.१ साहित्य अप्राप्त असतांना खोट्या प्रमाणकाव्दारे देयक मंजूर करणे :-

**परिच्छेद क्रमांक - ३.८३**

साहित्य अप्राप्त असताना खोट्या प्रमाणपत्राद्वारे देयक मंजूर करणे सन २००४-०५ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.८३ मध्ये इयत्ता १ ते ४ पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी लेखन साहित्य खरेदी करण्याकरिता रुपये ९,९६,७६४/- इतका खर्च करण्यात आला असून लेखन साहित्य अप्राप्त असताना खोट्या प्रमाणकाद्वारे देयक मंजूर करण्यात आल्याने याबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालात खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त करण्यात आले आहे.

**जिल्हा परिषद, गडचिरोली सन २००४-२००५ (परिच्छेद क्रमांक ८) -** जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी प्राथमिक शाळेतील इ.१ ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी लेखन साहित्य खरेदी करण्याकरिता एकूण रक्कम रु.९,९६,७६४/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

१) साहित्य प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचे साठा पुस्तकात नमूद करण्यात आलेले आहे. परंतु लेखापरिक्षणाच्या वेळेपर्यंत प्राप्त साहित्याचे वितरण दर्शविण्यात आलेले नाही.

२) साहित्य सुस्थितीत प्राप्त झाले असे प्रमाणित करण्यात आलेले असतांना सदर साहित्यबाबतचा धनादेश दि.३१ मार्च, २००५ ला वितरीत करण्यात आला नाही.

लेखापरिक्षणाच्या वेळेपर्यंत धनादेश स्थळप्रतिसोबत असल्याचे दिसून आले. उपरोक्त बाबी पाहता प्रत्यक्ष साहित्य प्राप्त झालेले नसतांना खोटे प्रमाणपत्र देऊन केवळ अनुदान अखर्चित राहू नये म्हणून देयक काढल्याचे व यामुळे शासनाची दिशाभूल केल्याचे स्पष्ट होते. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

सन २००४-२००५ या वर्षात १३ वने ७% वन महसूल अनुदानाअंतर्गत मंजूर अनुदानातून प्राथमिक शाळेतील इ.१ ली ते ४ थी पर्यतच्या विद्यार्थ्यांसाठी शालेयपाटी, प्लास्टीक फुटपट्टी, चित्रकलावही व कंपासपेटी खरेदी पोटी रु.९,९६,७६४/- खर्च करण्यात आले आहे.

१) शासन निर्णय क्रं.भाखस/२९७५/२००२/उद्योग-६ दि.७/३/२००२ च्या अनुषंगाने अधीक्षक औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद यांचे पत्र क्रं./औमका/खुका/जिप/४७९/२००५ दिनांक ७/२/२००५ अन्वये दिनांक ७/३/२००२ च्या शासन निर्णयानुसार कारागृह निर्मित शालेय साहित्यास आरक्षण दिलेले असल्याने दरपत्रक पाठविण्यात येत आहे. सदर दरपत्रकातील नमूद शालेय साहित्याची मागणी अग्रिम रकमेसह या कारागृहाकडेच नोंदवावी जेणेकरुन तात्काळ उत्पादनास सुरुवात करुन विहीत मुदतीत पुरवठा करणे शक्य होईल असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.गडचिरोली यांना कळविले तसेच या पत्रासोबत त्यांच्या अटी व शर्ती कळविल्या होत्या. त्यामधील अट क्रं.५ नुसार साहित्याचा पुरवठा, आदेश व आगाऊ रक्कम मिळाल्यावर ६० दिवसाच्या आत पुरवठा करण्यात येईल असे नमूद आहे. त्यानुसार त्यांना आगाऊ रक्कम देणे आवश्यक होते. दिनांक ३१/३/२००५ चा पुरवठा आदेश दिल्यानंतर सदरहू कारागृहाकडून रुपये रु.९,९६,७६४/- चे दिनांक ३१/३/२००५ चे अग्रिम देयक या कार्यालयास सादर केले त्यामुळे प्रथम धनादेश देणे आवश्यक होते. धनादेश प्राप्त करण्यासाठी साठा पुस्तकात नोंद घेवून देयकावर साहित्य प्राप्त झाल्याबाबत प्रमाणित करणे आवश्यक होते त्यामुळे लेखन साहित्य प्राप्त झाल्याची नोंद साठा पुस्तकात घेवून देयकावर तसे प्रमाणित करण्यात आले. देयकाची रक्कम रुपये रु.९,९६,७६४/- धनादेशाद्वारे प्राप्त झाल्यानंतर ८०% रक्कम रुपये ७,९७,४११/- चे धनादेश अधीक्षक

औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद यांचे नावे काढण्यात आले आणि धनादेश कारागृहाकडे पाठविण्यात येत असल्याबाबत दुरध्वनी वरुन कारागृहाला सांगण्यात आले असता. कारागृहाकडून काही तांत्रिक अडचणींमुळे साहित्य उत्पादनाचे कार्य बंद असल्याचे सांगितले व तसे दिनांक ७/३/२००६ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविले. प्रत्यक्षात साहित्य प्राप्त झालेले नसल्याने परीक्षणाचे वेळी साहित्याचे वितरण दर्शविण्यात आले नाही.

२) मुद्दा क्रमांक १ च्या उत्तरात नमुद स्थितीमुळे साहित्य प्राप्त झाल्याचे नमूद करण्यात आले, परंतु उत्पादन कार्य बंद असल्याचे दुरध्वनीवरुन समजल्यामूळे धनादेश वितरीत करण्यात आला नाही. त्यामुळे लेखा परीक्षणाचे कालावधीपर्यंत धनादेश स्थळ प्रती सोबत ठेवण्यात आले होते. मुद्दा क्रमांक १ च्या उत्तरात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेसाठी प्रमाणपत्र देणे गरजेचे होते व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. कारागृहाच्या पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही केलेली असून साहित्य प्राप्त झाल्यानंतर संबंधितांना वितरित करण्यात आलेले आहे व पोचपावत्या संबंधित नस्तीला जोडल्या असून उपलब्ध आहेत. त्यामुळे यात कोणत्याही प्रकारची शासनाची दिशाभूल झालेली नाही.

## १.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

समितीने दिनांक २९ ऑगस्ट, २०१२ रोजी गडचिरोली जिल्हा परिषदेस भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली भेटीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली असता सन २००४-०५ या आर्थिक वर्षात १३ वन ७% वन महसूल अनुदानांतर्गत मंजूर अनुदानातून प्राथमिक शाळेतील १ ते ४ इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी लेखन साहित्य खरेदी करण्यास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने ३/११ अन्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान केली असून उद्योग उर्जा विभागाच्या दिनांक ७/३/२००२ रोजीच्या शासन निर्णय मधील अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह औरंगाबाद येथून साहित्य खरेदी करावे, असे नमूद केले आहे. असे प्रभारी शिक्षणाधिकारी यांनी समितीस सांगितले. यावर समितीने अशीही विचारणा केली की, साहित्य प्राप्त न होता अगोदरच धनादेश आणि पोच पावती कशी देण्यात आली, निविदा केव्हा मागविण्यात आल्या. साहित्य पुरविण्याचे आदेश केव्हा देण्यात आले आणि प्रत्यक्ष साहित्य केव्हा प्राप्त झाले, साहित्य प्राप्त झालेले नसतानाही साहित्य प्राप्त झाल्याची नोंद का घेण्यात आली यावर दिनांक ३१ मार्च, २००५ व १४ डिसेंबर, २००५ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले होते. त्यानुसार १४ एप्रिल, २००७ रोजी साहित्य प्राप्त झाले असून दिनांक १४ डिसेंबर, २००५ रोजी धनादेश देण्यात आला असे समितीस सांगितले तथापि साहित्य प्राप्त झाल्याची नोंद का घेण्यात आली याबाबतचे उत्तर समितीला मिळू शकले नाही यावर समितीने तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांकडून १५ दिवसांत खुलासा मागविण्यात यावा असा समितीने निर्णय घेतला.

## १.३ मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून साक्षीच्यावेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे खालील मुद्यांबाबत जिल्हा परिषदेकडून अधिक माहिती मागविली.

साहित्य अप्राप्त असतांना खोट्या प्रमाणपत्राद्वारे देयक मंजूर करणे - सन २००४-२००५ या वर्षात १३ वने ७ टक्के वन अनुदान अंतर्गत मंजूर अनुदानातून प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांसाठी लेखनसाहित्य खरेदी करतांना पुरवठादारास दि.१४/१२/२००५ रोजी धनादेशाद्वारे प्रदान करण्यात येवून प्रत्यक्ष साहित्याचा पुरवठा दिनाक १४/६/२००६ रोजी प्राप्त झाला असल्याने साहित्य प्राप्त झाल्याचे खोटे प्रमाणपत्र देवून पुरवठादारास धनादेशाद्वारे प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्यावर काय कारवाई करण्यात आली, नसल्यास का नाही ?

उपरोक्त प्रश्नाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने खालीलप्रमाणे अधिक माहिती सादर केली.

सन २००४-२००५ या वर्षात १३ वने ७ टक्के वन महसुल अनुदान अंतर्गत प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांसाठी लेखन साहित्य पुरविणे या योजनेअंतर्गत रु.२५.०० लक्ष मुळ अर्थसंकल्पामध्ये तरतूद प्राप्त होती. त्यानुसार सदर योजना राबविण्यास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक १६.८.२००४ अन्वये ठराव क्र.३(११)अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली.

सुधारीत पुनर्विनियोजन अर्थसंकल्पामध्ये रु.१०.०० लक्ष तरतूद ठेवण्यात आलेली होती. उपलब्ध निधीला अनुसरुन शासन निर्णय दिनांक ७/३/२००२ मधील परिच्छेद २ नुसार परिशिष्ट-अ मधील कारागृह निर्मित साहित्य कारागृहाकडून खरेदी करण्यात यावी असे निर्देश असल्यामुळे लेखन साहित्य खरेदी करण्यास्तव दिनांक २७/०१/२००५ अन्वये अधिक्षक औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद यांना कारागृह उत्पादित साहित्याचे दर व पुरवठा करण्याच्या अटी व शर्ती पुरविणेबाबत पत्र देण्यात आले. त्यानुसार अधिक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद यांचे जावक पत्र क्र./औमका/खुका/जिप-४७९/२००५ दिनांक ७/२/२००५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे साहित्याची मागणी अग्रिम रक्कमेसह या कारागृहाकडेच नोंदवावी. जेणेकरुन तात्काळ उत्पादनास सुरुवात करुन विहीत मुदतीमध्ये पुरवठा करता येईल. आगाऊ रक्कम मिळाल्यानंतर ६० दिवसाचे आत पुरवठा करण्यात येईल असे नमुद आहे. त्यानुसार आवश्यक साहित्याचा पुरवठा करण्यास आगाऊ (अग्रिम) रक्कम देणे आवश्यक होते त्यामुळे दिनांक ३१/३/२००५ अन्वये पुरवठा आदेश दिल्यानंतर त्यांचे कडुन प्राप्त अग्रिम देयक रु.९,९६,७६४/- चे अनुषंगाने ८०% अग्रिम रक्कम रु.७,९७,४११/- चे धनादेश काढून संबधित पुरवठादारास अदा करणे आवश्यक होते.

सन २००४-०५ वर्षात प्राप्त निधी त्याच वर्षात खर्च करणे आवश्यक असल्याने त्यातच जिल्ह्याअंतर्गत प्राथमिक शाळेतील इ.१ ते ४ च्या विद्यार्थ्यांना शालेय पाटी, प्लास्टीक फुटपट्टी, चित्रकला वही व कंपासपेटी चा लाभ मिळावा या दृष्टिकोनातून देयक पारीत करण्यास अग्रिम देयकावर साहित्य पुरवठा झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले आणि अग्रिम रक्कम रु. ७,९७,४११/- चे धनादेश प्रत्यक्षात १४/१२/२००५ ला देण्यात आले. यात विद्यार्थ्यांना लेखन साहित्याचा लाभ मिळावा हा उदात्त हेतू होता म्हणून वित्तिय कार्यप्रणालीनुसार केवळ सोपस्कर पार पाडण्यात आले. यात कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही अशी या कार्यालयाची धारणा आहे.

तद्नंतर अधिक्षक, औरंगाबाद, मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद यांनी कार्यालयास दुरध्वनी द्वारे कळविले की, तांत्रिक अडचणीमुळे साहित्य उत्पादनाचे कार्य बंद आहे मागणी प्रमाणे साहित्य पुरवठा करता येणार नाही तसे दिनांक ७/३/२००६ चे पत्राअन्वये सुध्दा कळविले आहे. पुरवठादारास दिलेल्या ८०% अग्रिम रक्कमेचे साहित्य या कार्यालयास प्रत्यक्ष दिनांक १४/४/२००६ ला प्राप्त झाले नसून दिनांक १७/४/२००७ ला प्राप्त झालेले आहे. तद्नंतर पुरवठा आदेशातील सर्व साहित्य पंचायत समिती व जिल्हा परिषद हायस्कूल यांना वितरीत केलेले आहे व तशी पोच घेण्यात आलेली आहे.

साहित्य प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र देणारे तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री.पी.एस.पठारे हे असून त्यांचेकडून सदर मुद्याचे संबंधात या कार्यालयाचे पत्र क्र.जिपग/शिवि/भांडार/४४८/२०१३ दिनांक १४/०२/२०१३ अन्वये खुलासा मागविण्यात आला. प्राप्त खुलाशाचे अवलोकन केले असता औरंगाबाद मध्यवर्ती कारागृहाकडून खरेदी केलेले साहित्य शासन निर्णयातील निर्देश व सुचनानुसार करण्यात आले तसेच खरेदीबाबतची प्रक्रिया वित्तीय नियमावलीनुसार करण्यात आली असल्याने त्यातच जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी केले असल्याने देयके मंजूर होण्याचे दृष्टिने प्रमाणपत्र देण्याचे केवळ सोपस्कर पार पाडण्यात आले, या प्रकरणात मी दोषी नाही असा खुलासा सादर केलेला आहे. त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे. कारण कोणत्याही परिस्थितीत श्री.पी.एस.पठारे, तत्कालीन शिक्षणधिकारी (प्राथमिक) यांनी साहित्याचा पुरवठा न होताच खोटे प्रमाणपत्र देवून वरिष्ठांची दिशाभूल केलेली आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द १ ते ४ जोडपत्र बजावण्यात आले असून सदर प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा.

**१.४ विभागीय सचिवांची साक्ष :-**

जिल्हा परिषद स्तरावरील प्राप्त माहिती आणि मुख्य कार्यकारी अधिकारी याच्या साक्षी दरम्यान आढळलेल्या त्रुटीबाबत समितीने अधिक व वस्तुनिहाय माहिती घेण्यासाठी दिनांक १० जुलै, २०१३ रोजी ग्रामविकास विभागाच्या (शालेय शिक्षण विभाग) सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, साहित्य अप्राप्त असतांना खोट्या प्रमाणपत्राद्वारे देयक मंजूर करण्यात आले आहे. त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले आहे की, साहित्य अप्राप्त असताना खोट्या प्रमाणपत्राव्दारे देयक मंजूर करण्यात आले आहे. सन

२००४-०५ या वर्षात ७ टक्के वन अनुदानाअंतर्गत मंजूर अनुदानातून प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांसाठी लेखन साहित्य खरेदी करण्यास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली होती. याबाबत दिनांक ३१/३/२००५ व दिनांक १४/१२/२००५ रोजी जिल्हा कारागृह, औरंगाबाद यांना पुरवठा आदेश देण्यात आले असून दिनांक १४/०४/२००७ रोजी साहित्य प्राप्त झाले आहे. मात्र दिनांक १४/१२/२००५ रोजी धनादेश दिल्याचे दिसून आले आहे. पुरवठा आदेश दिल्यानंतर जवळ जवळ सव्वादोन वर्षानंतर साहित्य प्राप्त झाले आहे. अनुपालन अहवालात असा उल्लेख करण्यात आला आहे की, विद्यार्थ्यांना लेखन साहित्याचा लाभ मिळावा, हा उदात्त हेतू होता. सव्वादोन वर्षानंतर हे विद्यार्थी पुढील वर्गात गेले आहेत. एकीकडे सन २००४-२००५ मध्ये खर्च केल्याचे दाखविले आहे आणि दुसरीकडे लेखन साहित्य सव्वादोन वर्षानंतर प्राप्त झाले आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी साहित्य प्राप्त झाले नसले तरी प्राप्त झाल्याबाबतचे प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यावर शासकीय कामकाजात खोट्या नोंदी घेण्याचे प्रयोजन काय होते ? वित्तीय कामकाजात कॅफो यांचे काहीही नियंत्रण दिसून येत नाही. लेखाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची पडताळणी केली होती का? कारागृहाकडून वेळेत साहित्याचा पुरवठा होणार नाही, हे स्पष्ट झाले असताना बाजारातून निविदा मागवून लेखन साहित्य विद्यार्थ्यांना का उपलब्ध करुन देण्यात आले नाही? शिक्षणाधिकारी, कॅफो आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चूक झाली असे विभागाला वाटत नाही का ? चुकीच्या धोरणामुळे व खर्च वेळेत न झाल्यामुळे शासनाचे नुकसान झाले, असे विभागाला वाटत नाही का ? अशी पृच्छा समितीने केली असता विभागीय सचिवांनी असे नमूद केले की, कारागृहाकडून साहित्य खरेदी करावे असे शासनाचे धोरण आहे. तसेच कारागृहाकडे साहित्य खरेदीबाबतची मागणी नोंदविली गेल्यानंतर ८०% अग्रीम घेतल्याशिवाय मागणी नोंद करुन घेत नाही त्यामुळे साहित्य खरेदी कारागृहाकडूनच करण्यात यावी हि अट काढून टाकली पाहिजे इतर माध्यमातूनही जिल्हा परिषदेला खरेदीची परवानगी दिली पाहिजे. कारागृहाकडून विहीत वेळेत पुरवठा होईल किंवा नाही याचीही शाश्वती नाही हा इतिहास आहे. ह्या प्रकरणात सूध्दा अग्रीम मिळाल्यानंतर ६० दिवसाच्या आत पुरवठा करण्यात येईल अशी अट घातली होती तरीही विहित मुदतीत पुरवठा होऊ शकला नाही तसेच साहित्याचा पुरवठा व्हावा या उद्देशाने रक्कम काढली असेल तर पुरवठा झाल्यानंतरच ती रक्कम खर्च केली जाते असे समितीस सांगितले. समितीने अशीही विचारणा केली की, सन २००४-०५ या वर्षात मुलांना लेखन साहित्य पुरवठ्याचा निर्णय जिल्हा परिषदेने घेतला होता त्यानुसार

पुरवठा आदेश दिले. तथापि, पुरवठा सन २००६ मध्ये करण्यात आला त्यामुळे त्यावर्षी मुले साहित्यापासून वंचित राहिली का यावर विभागीय सचिवांनी त्यावर्षी मुले साहित्यापासून वंचित राहून विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याचे मान्य केले. तसेच त्यांनी असेही नमूद केले की, शासकीय आदेशाप्रमाणे कारागृहालाच पुरवठा आदेश देणे गरजेचे होते तथापि अन्य ठिकाणाहून खरेदीची मुभा असती तर त्या वर्षी मुलांना साहित्याचे वाटप करता आले असते असेही नमूद केले. साहित्य प्राप्त नसतानाही साहित्य मिळाल्याचे तत्कालीन शिक्षण अधिकाऱ्यांनी प्रमाणपत्र का देण्यास आले तसेच कारागृहाकडून साहित्य प्राप्त होत नव्हते तर त्यांचेकडून तसे लेखी घेऊन इतर ठिकाणांहून साहित्याची खरेदी का करण्यात आली नाही. यावर विभागीय सचिवांनी असे नमूद केले की यामध्ये शिक्षणाधिकारी यांचा हेतू अशुध्द नव्हता जिल्ह्यासाठी मिळालेला निधी खर्च झाला पाहिजे अशी त्यांची भावना होती. तसेच पुरवठा आदेश देण्यात आले त्यावेळी ८०% आगाऊ रक्कम देण्यात आली होती. एकदा आगाऊ रक्कम प्राप्त झाल्यानंतर पुरवठादार मालाचा पुरवठा करतात.

**१.५ अभिप्राय व शिफारशी :-**

गडचिरोली जिल्हा परिषदेतील इयत्ता १ ते ४ च्या विद्यार्थ्यांना लेखन साहित्य खरेदी करण्यासाठी जिल्हा परिषदेने घेतलेला निर्णय उदात्त होता. प्रशासनाने औरंगाबाद कारागृहाच्या प्रशासनाला आदेश देवून तसेच कारागृह प्रशासनाने साहित्यापोटी ८०% आगाऊ रक्कम दिनांक १४ डिसेंबर, २००५ रोजी स्विकारुनही साहित्याचा पुरवठा मात्र तब्बल सव्वा दोन वर्षांनी म्हणजेच दिनांक १७ एप्रिल, २००७ रोजी करण्यात आला त्यामुळे अहवाल वर्षातील मुले साहित्यापासून वंचित राहिली. यासाठी शासनाच्या आदेशानुसार साहित्य खरेदी कारागृहाकडूनच करण्यात यावी असे स्पष्टपणे नमूद केले आहे. तथापि, कारागृहाने दूरध्वनीवरुन आणि दिनांक ७ मार्च, २००६ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेला काही तांत्रिक अडचणीमुळे मागणीप्रमाणे साहित्य पुरवठा करता येणार नाही असे कळविले होते त्यामुळे कारागृह साहित्याचा पुरवठा वेळेवर करीत नसल्याने जिल्हा परिषदेने तात्काळ निर्णय घेऊन दुसरीकडून साहित्य खरेदी करुन विद्यार्थ्यांना साहित्य वितरीत करणे आवश्यक होते. तथापि, जिल्हा परिषदेने तसे न करता वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिले असल्यामुळे जिल्हा परिषदेने मुलांना देय असलेल्या शिक्षण साहित्य वाटपात अक्ष्यम्य निष्काळजीपणा केला असल्याचे स्पष्ट होते. समिती याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. जिल्हा परिषदेने पुरवठा आदेश दिल्यानंतर दोन महिन्यात संबंधित संस्थेने शैक्षणिक साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक होते.

उक्त कालावधीत साहित्याचा पुरवठा करण्यात आला नाही त्यामुळे जिल्हा परिषदेने स्मरणपत्रे पाठवून किंवा प्रत्यक्ष भेटून त्याचा पाठपुरावा करणे गरजेचे होते. तथापि याबाबत जिल्हा परिषदेकडून कोणतीही कार्यवाही झाल्याचे समितीला दिसून येत नाही.

समितीसमोर साक्ष देताना विभागीय सचिवांनी मान्य केले की, राज्यातील कारागृहाकडून मागणीनुसार कधीच विहित कालावधीत पुरवठा केला जात नाही. असे असूनसुध्दा शासनाने कारागृह प्रशासनाविरुध्द साहित्य पुरवठा करण्याच्या निर्णयामध्ये बदल करण्याचा विचार केलेला दिसून आला नाही. दिनांक १६ ऑगस्ट, २००४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत जिल्हा परिषदेने ठराव क्र.३(११) अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. त्यानंतर जिल्हा परिषदेने साहित्याचा पुरवठा आदेश तब्बल पाच महिन्यांनी म्हणजेच दिनांक २७ जानेवारी, २००५ रोजी उत्पादित साहित्याचे दर पुरवठा करण्याच्या अटी व शर्तीचे पत्र औरंगाबाद कारागृहाच्या प्रशासनास दिले. त्यानंतर दिनांक ७ फेब्रुवारी, २००५ रोजी कारागृहाने जिल्हा परिषदेला साहित्य अनुपलब्धतेबाबत कळवूनही दीड महिन्याच्या अंतराने पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले. यामध्ये जिल्हा परिषद वेळेवर निर्णय घेऊ शकली नाही हे स्पष्ट होते. तसेच जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचा साहित्य खरेदी प्रकरणी अक्षम्य निष्काळजीपणा दिसून येतो.

विद्यार्थ्यांना लेखन साहित्याचा लाभ मिळावा या उदात हेतूने जिल्हा परिषदेने खरेदीचा निर्णय घेतला तथापि, तब्बल सव्वा दोन वर्षांनंतर साहित्याचा पुरवठा झाल्याने ज्या विद्यार्थ्यांना ते साहित्य देत होते ते विद्यार्थी पुढील वर्गात गेले त्यामुळे ते साहित्यापासून वंचित राहिले. तसेच साहित्य प्राप्त न होताच शिक्षणाधिकाऱ्यांनी साहित्य प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र दिले व शासकीय कामकाजात खोट्या नोंदी घेतल्या ही गंभीर स्वरुपाची बाब समितीसमोर साक्षीच्या वेळी उघडकीस आली.

औरंगाबाद कारागृहाच्या प्रशासनाला शालेय साहित्य पुरवठ्याचे आदेश देऊनही त्याचा पाठपुरावा तत्कालीन शिक्षण अधिकाऱ्यांनी न करणे व विद्यार्थ्यांना साहित्यापासून वंचित ठेवणे, तसेच त्यांनी शालेय साहित्य प्राप्त झाल्याचे खोटे प्रमाणपत्र देऊन शासकीय कामकाजात खोट्या नोंदी घेणे इत्यादी बाबतीत तत्कालीन शिक्षणाधिकारी दोषी असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. कारागृहाकडून साहित्याचा पुरवठा वेळेवर होत नाही. त्याचप्रमाणे कारागृह प्रशासनाकडून साहित्यापोटी ८० टक्के अग्रिम घेतला जातो त्यामुळे वेळ आणि पैसा या दोन्ही बाबीचा अपव्यय होतो असेही समितीचे मत आहे.

एकंदरीतच या प्रकरणात तत्कालीन शिक्षण अधिकाऱ्यांचा गलथानपणा उघडकीस आला असून, तत्कालीन शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी. त्याचप्रमाणे कारागृहाकडून लेखन साहित्य वा अन्य बाबी खरेदी करताना प्रथम त्यांचेकडून साहित्य पुरवठ्याबाबत हमी घेऊनच अग्रिम रक्कम जमा करावी आणि त्यांनी विहित कालावधीत अशा मागणी केलेल्या साहित्याचा पुरवठा वेळेवर करण्याबाबत आदेशात स्पष्ट उल्लेख करावा व असा पुरवठा वेळेवर न केल्यास कारागृह प्रशासनाविरुध्ददेखील कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने उचित आदेश निर्गमित करावेत अशी समिती शिफारस करीत आहे.

उक्त शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावी.

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद ठाणे

### २.१.१ तरतूद नसताना केलेल्या नियमबाह्य खर्चाबाबत :- परिच्छद क्र. ३.७८

सन २००५-२००६ या वर्षाच्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील ठाणे जिल्हा परिषद संदर्भात "तरतूद नसताना केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत" यावर लेखा परिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत. जिल्हा परिषद, ठाणे यांनी शैक्षणिकदृष्या मागासलेल्या अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना टी.एस.पी. योजनेखाली तरतूद नसताना रक्कम रुपये ४,०७,४१८ नियमबाह्य खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) पंचायत समिती मोखाडा यांनी अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती, लेखासंहिता, १९६८ चे परिशिष्ट ४ चे तरतुदीनुसार विहित केलेल्या वित्तीय निष्कर्षाकडे दुर्लक्ष केल्यामुळे सदरचा खर्च वसूलपात्र ठरतो. तरी याबाबत पूर्तता दाखविणे आवश्यक आहे.

२) पंचायत समिती वसई यांनी वेतन व भत्तेमधील तरतूदीतून ४ टक्के सादिलसाठी रक्कम रुपये २०,००,००० खर्च केला असून तरतूद नसताना खर्च कोणत्या आधारे करण्यात आला व वेतन अनुदानाच्या रकमेतून खर्च केला असल्याने कमी झालेल्या अनुदानातून वेतनाचा खर्च कसा भागविला याचा खुलासा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे खुलासा केला.**

१) परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थीनींना उपस्थिती भत्ता या योजनेसाठी तरतूद प्राप्त होईल या अपेक्षेने खर्च केला होता. आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थीनीचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, आदिवासी भागातील विद्यार्थीनीची गळती होऊ नये व त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचाविण्यासाठी सदर विद्यार्थीनीना लाभ देण्यात आला आहे. सदर झालेला खर्च सन २००५-०६ च्या अनुदान निर्धारण अहवालात संचालक, शिक्षण संचालनालय, पुणे यांनी मान्य केला आहे.

२) परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे ४% सादिल मध्ये शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग दि. १४ नोव्हेंबर १९९४ मधील प्रपत्र "अ" नुसार शाळा पातळीवर खडुफळा, फाईल कव्हर, टाचण्या, कचरा पेटी कुलूप व इतर साहित्य खरेदीसाठी तरतूद

उपलब्ध होईल या अनुषंगाने वसई गटाने खर्च केला होता. परंतु सदर तरतूद २००५-०६ मध्ये प्राप्त न झाल्यामुळे २००५-०६ चा झालेला खर्च सन २००५-२००६ च्या अनुदान निर्धारण अहवालात मान्य केला आहे.

**१.१.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी पंचायती राज समितीने दिनांक १६ ऑक्टोबर २०१२ रोजी जिल्हा परिषद ठाणे येथे भेट देऊन . मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती वसई यांनी वेतन व भत्ते मधील तरतूदीतुन ४% सादिलसाठी तरतूद नसताना रु. २० लाख इतकी रक्कम कोणत्या आधारे खर्च करण्यात आली, वेतन अनुदानाच्या रकमेतून खर्च केला असल्याने कमी झालेल्या अनुदानातून वेतनाचा खर्च कसा भागविला जातो, अशा प्रकारचा निधी वेतन व भत्याकरीता वापरला जातो का, तसेच याप्रकरणी वरिष्ठ अधिका-यांकडून परवानगी घेण्यात आली होती का? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी असे नमूद केले की शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दिनांक १४ नोव्हेंबर १९९४ नुसार खडू, फळा, फाईल कव्हर, टाचण्या, कचरापेटी, व कुलुप इतर साहित्य खरेदीसाठी तरतूद उपलब्ध होईल असे अपेक्षित होते व त्या अनुषंगाने वसई गटाने खर्च केला तथापि सन २००५-०६ मध्ये तरतूद प्राप्त न झाल्यामुळे या वर्षातील खर्च सन २००५-०६ च्या अनुदान निर्धारण अहवालात मान्य करण्यात आला आहे. तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साहित्य खरेदीसाठी खर्च केला असून त्यास मंजुरी देण्यात आली आहे असे समितीस सांगितले. या झालेल्या अनियमितबाबत संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस असे सांगितले की, पंचायत समिती स्थरावरील गटाकडून सदरचा खर्च झाला आहे तसेच जिल्हा परिषदेच्या स्तरावरुन संबंधित गटांना अनुदान दिले जात असल्यामुळे सदर खर्चाची जबाबदारी पंचायत समितीची नसून जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागाची असते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे सांगितले की मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांची मान्याता न घेता गट स्तरावर यासंबंधी खर्च झाला असून याप्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई केली पाहिजे हि बाब मान्य असल्याचे सांगितले. यासंदर्भात तत्कालीन गटविकास अधिकारी, वसई यांनी समितीस असे सांगितले की तत्कालीन गटशिक्षण अधिकारी यांनी तरतूद असल्याचे सांगितले होते आणि त्यावेळी सादिलवर खर्च करणे आवश्यक होते त्यामुळे सदरहू देयके पारित

करण्यात आली तसेच तरतूद उपलब्ध असल्यासंबंधी लेखा विभागाकडून सांगण्यात आले होते. त्यामुळे त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात आली यानंतर समितीने असे सांगितले की याप्रकरणी जे कोणी दोषी असतील त्यांना कारणे दाखवा नोटीस द्यावी व या प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल एक महिन्यात समितीला सादर करावी असे निदेश दिले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या निदेशानुसार कार्यवाही केली जाईल असे सांगितले.

**२.१.३ उपरोक्त प्रकरणी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) पंचायत समिती वसई यांनी शैक्षणिक दृष्टया मागास असलेल्या अनुसूचित जाती/जमातीसाठी टी.एस.प्‌ी. योजने अंतर्गत वेतन व भत्यामधील तरतुदीतून ४% सादिलसाठी केलेला खर्च तरतूद नसतांना कोणत्या आधारे करण्यात आला व यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

२) तसेच या प्रकरणी संबंधित दोषीवर कारवाई करुन समितीला सविस्तर माहिती सादर करण्यात येईल असे मान्य करूनही अद्याप माहिती सादर का करण्यात आली नाही ?

उपरोक्त प्रकरणी विभागाने खालील प्रमाणे खुलासा केला.

१) शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दि. १४ नोव्हेंबर १९९४ नुसार खडू, फळा, फाईल, कव्हर, कचरा पेटी, कुलूप, टाचण्या व इतर साहित्य खरेदीसाठी तरतूद उपलब्ध होईल असे अपेक्षित होते व त्या अनुषंगाने वसई गटाने खर्च केला आहे.

२) जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडील सूचनेनूसार गट स्तरावरुन कार्यवाही चालू करण्यात आलेली आहे. तसेच ग.वि.अ. व ग.शि.अ. यांना ज्ञापन देऊन खूलासा मागविणेत आला आहे. सभेचे इतिवृत्त माहे जानेवारी अखेर प्राप्त झाले आहे. त्यामध्ये नमूद केलेल्या सूचनांप्रमाणे दोषींवर कारवाई करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. कार्यवाही पूर्ण् झालेली नसल्याने समितीला विहित कालावधीत माहिती सादर करता आली नाही.

**२.१.४ विभागीय सचिवांची साक्ष**

विभागाकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीचे अवलोकन करुन समितीने त्या अनुषंगाने दिनांक १२ नोव्हेंबर २०१३ रोजी ग्रामविकास विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, वेतन व भत्यामधील तरतूदीतुन ४ टक्के सादिलसाठी केलेला खर्च तरतूद नसताना कोणत्या आधारे करण्यात आला व यास जबाबदार असणा-या अधिकारी/कर्मचा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली. यावर विभागीय सचिवांनी समितीस असे सांगितले की, वेतन व भत्यामधील तरतूदीतुन इतर गोष्टी पुरविण्यासाठी रु. ४.०७ लाख इतका खर्च केला आहे त्यात भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहार झालेला नसून अनियमितता झालेली आहे या मुद्यावरुन समितीच्या बैठकीत चर्चा झाल्यानंतर विभागीय चौकशीची कारवाई प्रस्तावित करण्यात आली असून संबंधित गटविकास अधिकारी यांना विभागीय आयुक्तांमार्फत नोटीस देण्यात आली आहे तसेच आयुक्तांचा अहवाल प्रलंबित असून अहवाल प्राप्त होताच विभागीय चौकशी करण्यात येईल. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की गटशिक्षणाधिकारी व गटविकास अधिकारी यांना ३१ मार्च रोजी वर्षासाठी सादिलवर खर्च करण्याकरीता तालुका स्तरावरील सर्वच शाळांना निधी वर्ग केला होता. आक्षेप उपस्थित झाल्यानंतर हा सर्व निधी संबंधित शाळांकडून परत घेण्यात आला आणि गटविकास अधिका-यामार्फत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे जमा करण्यात आला. गटशिक्षणाधिकारी व गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या पातळीवर तरतूद नसताना चुक केली असल्यामुळे त्यांना जबाबदार धरण्यात आले असून त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. यासंदर्भात समितीने ऑक्टोबर २०१२ मध्ये झालेल्या जिल्हा बैठकीत संबंधितांविरुध्द कारवाई करण्याचे निदेश दिले असताना एक वर्षाचा कालावधी होऊन गेला असल्याने शासनाने आजच्या बैठकीत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीने देणे अपेक्षित असताना तसे न करता कारवाई प्रस्तावित केल्याचे नमूद केले आहे त्यामुळे कारवाई करण्यासाठी आणखी किती कालावधी लागणार आहे अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की यामध्ये गैरव्यवहार किंवा भ्रष्टाचार झालेला नसून अनियमितता झालेली आहे याची एक महिन्यात चौकशी आदेशीत करु तसेच खरेदी झालेली नसून चूक निदर्शनास आल्यावर निधी परत घेण्यात आला आहे. सदरचा निधी केव्हा दिला होता व शाळांकडून तो केव्हा वसूल करण्यात आला अशी विचारणा केली असता ३१ मार्च २००६ रोजी निधीचे वाटप केले तर फेब्रुवारी २००७ मध्ये परत घेण्यात आला आणि ११ ऑगस्ट २००८ मध्ये

सर्व रक्कम मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे जमा केल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले.

उपरोक्त प्रकरणी शंकेला वाव असल्यामुळे यासंदर्भात सविस्तर माहिती समितीला १५ दिवसात सादर करण्यात यावी. सदरची चूक हेतुपूर्वक करण्यात आली असेल तर ती समोर आली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले.

**२.१.५ अभिप्राय व शिफारशी :-**

जिल्हा परिषद ठाणे यांनी पंचायत समिती मोखाडा अंतर्गत शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या अनुसूचित जाती/ जमातीच्या विद्यार्थ्यांना टी.एस.पी. योजनेखाली तरतूद नसताना रक्कम रुपये ४,०७,४१८ नियमबाह्य खर्च केला तसेच पंचायत समिती वसई यांनी वेतन भत्त्यातील तरतुदीतून ४ टक्के सादिलसाठी रुपये २०,००,०००/- इतका खर्च केला आहे. उपरोक्त प्रकरणी सादिलवर खर्च करण्यासाठी तरतूद करण्यात आली नव्हती तरी जिल्हा परिषदेने जिल्हा परिषदेच्या शाळांना सादिलवर खर्च करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला. सदरची कृती नियमबाह्य असून या प्रकरणी शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या अनुसूचित जाती/जमातींच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक भत्ता या योजनेसाठी तरतूद प्राप्त होईल या अपेक्षेने खर्च केला होता तसेच विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, विद्यार्थ्यांची गळती होऊ नये त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी तसेच शाळा पातळीवर खडूफळा, फाईल कव्हर, टाचण्या इत्यादी साहित्य खरेदीसाठी सदरचा खर्च केला आहे असा जिल्हा परिषदेने केलेला खुलासा समितीला मान्य होण्यासारखा नाही. कारण ज्या बाबीसाठी निधीची तरतूद करण्यात आली त्या बाबीसाठी निधी खर्च न करता नियमबाह्यरित्या व वरिष्ठ अधिकाऱ्यांची कोणत्याही प्रकारची मान्यता न घेता दुसऱ्याच बाबीवर निधी खर्च करण्यात आला आहे. ज्या बाबीसाठी खर्च केला जात आहे त्या बाबीसाठी शासनाने तरतूद उपलब्ध करुन दिली किंवा कसे ही बाब संबंधितांनी तपासणे आवश्यक आहे. परंतु याबाबतची शहानिशा न करता अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना त्यांची शाळेतील गळती कमी होऊ नये या दृष्टीकोनातून शासनाने त्यांना शैक्षणिक भत्ता मंजूर करुन त्यासाठी तरतूद उपलब्ध करुन दिल्याचे अभिलेख्यावरुन तसेच समितीसमोर झालेल्या साक्षी पुराव्यावरुन दिसून येते. परंतु अशा तरतुदीवरील शैक्षणिक भत्ता विद्यार्थ्यांची गळती रोखण्याच्या दृष्टीने त्यांना देणे आवश्यक असतानादेखील त्यांना सदरचा भत्ता न देता सादीलच्या कामावर खर्च करणे याद्वारे एक प्रकारे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी त्यांची दिवाळखोरीच सिध्द केली आहे. या प्रकरणी जरी अनियमितता वाटली तरी संबंधित

अधिकाऱ्यांनी शासनाच्या ध्येय धोरणांना डावलून मनमानीपणे स्वत:च्या अधिकारात असा निर्णय घेऊन रक्कम खर्च करणे हे नक्कीच निषेधार्ह असून याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. त्याचप्रमाणे समितीसमोर ही बाब उघड होऊनही संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई प्रस्तावित करुनही विभागीय चौकशीची कार्यवाही अद्यापही प्रलंबित आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई झालेली दिसून येत नाही. सदरचा खर्च हा सन २००५-२००६ या वर्षातील असून सन २०१३ पर्यंत या प्रकरणी कारवाई न होणे हे नक्कीच अशोभनीय आहे. **त्यामुळे समिती अशी शिफारस करते की, या प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांनी अनियमितता केली आहे अशा अधिकाऱ्यांविरुध्द प्रस्तावित असलेली विभागीय चौकशी तातडीने व विहित मुदतीत पूर्ण करुन संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी. या संदर्भात त्वरेने कारवाई करुन त्याची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## जिल्हा परिषद, ठाणे

### २.२.१ दुधाळ जनावरांचे नियमबाह्यरित्या वाटप :-

**सन २००५-०६ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.३.९३४)**

जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत पशुसंवर्धन विभागाने विशेष घटक योजनेअंतर्गत दुधाळ जनावरांच्या वाटपाची योजना राबविली असून त्यासाठी रक्कम रुपये २०.८७ लाख तरतूद करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

१) विशेष घटक योजनेअंतर्गत दुधाळ जनावरांचे वाटपाबाबत गटाचे प्रस्ताव तपासता वाडा तालुक्यातील लाभार्थ्यांकडील रेशन कार्डाची झेरॉक्स व जातीचा दाखला उपलब्ध झाला नाही. तसेच शहापूर, मुरबाड, पालघर, भिवंडी, अंबरनाथ गटाकडील लाभार्थ्यांचे अनुक्रमे जातीचे दाखले व रेशनकार्डाची झेरॉक्स उपलब्ध झाली नाही. त्याचे प्रमाणे मुरबाड गटाकडील बेबी भालेराव यांचा जातीचा दाखला व मर्यादीत कुटूबाची कागदपत्रे नसताना लाभ कसा दिला याचा साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

२) शासन निर्णय पत्र क्र. १०२००४/१८१०३/ प्रक्र ३६७/पदुम ४, दिनांक ५ ऑक्टोबर, २००४ अन्वये लाभार्थीची निवड जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित केलेल्या (१) जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त अध्यक्ष (२) जिल्हा समाजकल्याण अधिकारी सदस्य (३) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी समिती सदस्य या तिघांच्या मंजूरीने लाभधारकाची निवड विशेष घटक योजनेअंतर्गत करणे बंधनकारक आहे. प्राप्त ९३ प्रस्तावामधून पात्र ९१ प्रस्ताव दिनांक २० जानेवारी, २००६ रोजी झालेल्या बैठकीत समितीने मंजूर केले होते. सदर लाभार्थ्यांचे प्रस्ताव शासन निर्णयानुसार गठीत झालेल्या समितीने अवैध ठरविलेले असताना समितीमधील जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी दिनांक २६ मार्च, २००६ च्या मंजूर टिप्पणीमध्ये पालघर गटाकडील लाभार्थी श्री. संजय महादेव मोरे राहणार एडवण यांचा प्रस्ताव मंजूर केल्याचे दिनांक २७ मार्च, २००६ नुसार गट विकास अधिकारी पालघर यांना कळविले आहे. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार नसताना व शासकिय नियमांचे पालन न करता नियमबाह्य समितीचा निर्णय डावलून श्री. संजय महादेव मोरे यांना या योजनेचा नियमबाह्यरित्या लाभ दिला आहे. त्यामुळे दिलेल्या अनुदानाची रक्कम प्रती म्हैस रुपये ८७५०-/ प्रमाणे तीन म्हशीचे रक्कम रुपये २६२५०/- संबंधित जबाबदार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडून वसुल करणे आवश्यक आहे. तरी समितीने श्री मोरे यांचा प्रस्ताव अवैध ठरविला असताना जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी सदरचा प्रस्ताव कसा वैध ठरविला याचा संबंधित खुलासा होणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रकरणी जिल्हा परिषदने खालीलप्रमाणे खुलासा केला.

१) विशेष घटक योजनेअंतर्गत खात्याच्या मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थ्याचे आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव पंचायत स्तरावरुन जिल्हास्तरावर प्राप्त झाल्यावर शासनाने जिल्हास्तरावर गठीत केलेल्या समितीसमोर सादर केली जातात त्या वेळी प्रस्तावाची छाननी करुन उपलब्ध अनुदानाच्या अनुषंगाने लाभार्थी निवडण्यात येतात. लाभार्थीनिवडी नंतर निवड यादी व अनुषंगिक अभिलेखे पंचायत समितीकडे परत केली जातात. सदर अभिलेखे पंचायत समिती स्तरावर उपलब्ध आहेत. मुरबाड गटाकडील श्रीम. बेबी भालेराव यांचा जातीचा दाखला व अनुषंगीक अभिलेखे देखील उपलब्ध आहेत.

२) विशेष घटक योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्रक्रीयेत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त-अध्यक्ष, समाजकल्याण अधिकारी-समिती सदस्य, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी-समिती सदस्य यांचे समितीमार्फत लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. समितीने मंजूर केलेल्या यादीमधील श्रीम. शकुंतला हरीशचंद्र जाधव या लाभार्थीने ५०% रक्कम भरण्यास असमर्थता व्यक्त केली. पंचायत समितीकडील प्राप्त प्रस्तावानुसार, सदर लाभार्थीऐवजी दुस-या लाभार्थ्याची निवड करणेकरीता निवड समितीची अगदी वेळेवर सभा लावणे शक्य नसल्याने, योजना नियंत्रण अधिकारी तथा निवड समिती सदस्य सचिव जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी निवड समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या मान्यतेने श्री. संजय महादेव मोरे यांची या योजनेसाठी निवड केली आहे. सदर लाभार्थी निवड वैध असल्याने वसुली करण्यात आलेली नाही.

### २.२.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

ठाणे जिल्हा परिषदेच्या भेटीच्या वेळी वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, निवड समितीच्या बैठकीशिवाय लाभार्थी निवडताना कोणाची मान्यता घेण्यात आली तसेच संबंधित अभिलेखे लेखा परिक्षकांना का उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत. यावर समितीसअसे सांगण्यात आले की, एकाच लाभार्थ्याला वेळेवर मान्यता देण्यात आलेली आहे तसेच वेळेवर सभा लावणे शक्य न झाल्यामुळे एका लाभार्थ्याची निवड बैठकी व्यतिरिक्त उपआयुक्तांची मान्यता घेऊन निवड करण्यात आली आहे. अन्य सर्व लाभार्थ्यांची आवश्यक कागदपत्रे घेतलेली आहेत. सन २००५-०६ मध्ये एकूण २६ लाभार्थी निवडलेले होते तर लक्षांक ८१ एवढा होता असे जिल्हा पशुसंवर्धन

अधिकारी यांनी सागितले. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कागदपत्र उपलब्ध होती असे नमूद केले, मात्र ती का दाखविण्यात आली नाही याचे उत्तर समितीला मिळाले नाही. समितीने अशीही विचारणा केली की, नियमानुसार निवड समितीच्या बैठकीत लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक असताना उपायुक्तांच्या परवानगीने निवड केली त्यांना तसे अधिकार आहेत काय, या संदर्भात केलेला लेखी खुलासा न पटणारा आहे. कितीही तातडी असली तरी बैठक बोलविता आली असती तसेच शासन निर्णय ५ ऑक्टोबर, २००४ अन्वये जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने लाभार्थ्यांची निवड करणे अपेक्षित असताना तसे न करणे केवळ उपायुक्तांच्या नियुक्तीने व शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता केवळ उपायुक्तांच्या परवानगीने लाभार्थ्याची निवड करण्यात आली. शासन निर्णयाविरुध्द कार्यवाही केल्यामुळे सदर निवडीमध्ये पारदर्शकतेचा अभाव असून संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी आणि संपूर्ण रक्कमेची वसुली करुन तसेच एकूण लाभार्थी,लाभर्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या जनावरांची संख्या त्यांची किमत याबाबतचा अहवाल समितीला उद्या सादर करण्यात यावा असे समितीने निदेश दिले.तथापि समितीने दिलेल्या निदेशानुसार अद्याप माहिती प्राप्त झाली नाही.

**२.२.३ उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून लेखी माहिती मागविली.**

१) दुधाळ जनावरांचे गटवाटप योजनेत नियमानुसार निवड समितीच्या बैठकीत लाभार्थ्यांची निवड न करता नियमबाह्यरित्या निवड केल्याप्रकरणी संबंधितांकडून वसुली केली आहे काय, तसेच यास जबाबदार कोण आहे ?

२) लाभार्थी निवडीसंबंधीचे कागदपत्र लेखापरिक्षकांना न दाखविण्याची कारणे काय व संबंधिताविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली ?

समितीच्या उपरोक्त मुंद्याबाबत विभागाकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

१) पंचायत राज समितीच्या इतिवृत्तामध्ये समिती प्रमुखांनी सदर निवड शासन निर्णयाविरुध्द कार्यवाही केली असल्यामुळे तात्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शशांक कांबळे यांना रु. २६२५०/- रक्कम भरण करण्याबाबत या कार्यालयास पत्र क्रमांक ठाजिप/पंस/नियो/३४१/१३ दिनांक २२-३-२०१३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तात्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.शशांक कांबळे हे जबाबदार

असल्यामुळे त्यांच्याकडून परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे रु. २६२५०/- वसुली दिनांक २२/५/२०१३ रोजीच्या चलनान्वये शासकिय कोषागारात भरणा करण्यात आली आहे.

२) विशेष घटक योजनेंतर्गत खात्याच्या मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थिचे आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव पंचायत स्तरावरुन जिल्हा स्तरावर प्राप्त करुन शासनाने गठीत केलेल्या समितीसमोर सादर केली जातात निवड समिती लाभार्थी निवड करुन निवड यादी व अनुषंगीक कागदपत्रे पंचायत समितीकडे पाठविली जातात. या बाबत पंचायत समिती स्तरावर देखील याचे लेखापरिक्षण करण्यात येते तसेच स्थानिक निधी लेखा कार्यालयाकडील लेखा परिक्षण जिल्हास्तरावर झालेले असल्याने लेखा परिक्षणाच्यावेळी कार्यालयातील मुळ नस्ती दाखविण्यात आली आहे.

**२.२.४ विभागीय सचिवांची साक्ष :-**

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने विभागीय सचिवांची दिनांक २७ जून, २०१३ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, दुधाळ जनावरांचे गटवाटप योजनेत नियमानुसार निवड समितीच्या बैठकीत लाभार्थ्यांची निवड न करता नियमबाह्यरित्या निवड केल्याप्रकरणी संबंधिताकडून वसुली केली आहे काय, तसेच यास जबाबदार कोण आहे ? लाभार्थी निवडीसंबंधीचे कागदपत्र लेखापरिक्षकांना न दाखविण्याची कारणे काय आहेत व संबंधिताविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली ? रक्कम वसुल झाली आहे परंतु घडलेल्या प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून आपण कोणत्या उपाययोजना करणार आहात ? यावर पशुसंवर्धन विभागाच्या सचिवांनी असे सांगिले की, उमेदवारांची यादी निवड समितीकडे सादर न करता स्वत: लाभार्थी निवड केली होती आणि त्यानुसार दुधाळ जनावरांचे वाटप झाले होते. जिल्हा परिषदेने संबंधिताकडून जेवढ्या रकमेची जनावरे वाटप केली, तेवढी रक्कम वसुल केली आहे. या संदर्भातील कार्यवाही सुरु केली असू संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे. ही योजना जिल्हा स्तरावरावरील असून राज्य स्तरावरील नाही. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात समिती नेमली आहे. सदर समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा समावेश आहे. सदर समितीमार्फत लाभार्थ्यांची निवड केली जाते. समितीची मान्यता न घेता लाभार्थ्यांची निवड झाली. त्यामुळे संबंधितांकडून दंड वसुल केला आहे. तसेच आम्ही या संदर्भात संबंधितांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे. त्याचप्रमाणे विभागीय कारवाई देखील करणार आहोत.

समितीने अशीही विचारणा केली की, हे प्रकरण कोणत्या वर्षाचे आहे, आपण कारणे दाखवा नोटीस केव्हा दिली, तसेच लेखा परिक्षणामध्ये हा मुद्या सन २००५-२००६ मध्ये निदर्शनास आला. त्यावेळी ही कारवाई का करण्यात आली नाही, पंचायती राज समितीने भेट दिली म्हणून दंड वसुल केला काय, संबंधितांवर कारवाई करण्याचे अधिकर कोणाचे आहेत ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, हे प्रकरण २००५-०६ या वर्षाचे आहे. तसेच लेखा परिक्षणामध्ये मुद्या आल्यानंतर कारवाई होणे अपेक्षित होते. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असेही नमूद केले की, पंचायत राज समितीने भेट दिल्यानंतर संबंधितांना कारणे दाखवा नोटिस दिली आहे. या प्रकरणाची चौकशी केली असून विभाग प्रमुखांनी या संदर्भातील अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केला नव्हता. या प्रकरणांस ते स्वत: जबाबदार असून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येईल व त्याची प्रत समितीला पाठविण्यात येईल असे नमूद केले. समितीने अशीही विचारणा केली की, संबंधिताचे त्याचवेळी निलंबन करुन चौकशी का करण्यात आली नाही यामध्ये पाठपुरावा करण्यात खंड पडला असल्यामुळे सदरचे प्रकरण गंभीर स्वरुपाचे आहे. यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी या प्रकरणी जिल्हा परिषदेमार्फत चौकशी करुन निलंबनाची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येईल असे नमूद केले. तर समितीने दिलेल्या निदेशाप्रमाणे सदर प्रकरणी एक महिन्यात कारवाई करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. त्यावर या प्रकरणी कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा असे समितीने निदेश देऊनही अद्याप अहवाल अप्राप्त आहे.

**२.२.५ अभिप्राय व शिफारशी :-**

दुधाळ जनावरांचे वाटप प्रकरणी शासनाने काढलेल्या शासन निर्णयानुसार जनावरांचे वाटप करणे आवश्यक होते. या प्रकरणी कितीही तातडी असली तरी शासन निर्णयानुसार वाटप होणे अपेक्षित आहे. परंतु विभाग प्रमुखांनी स्वत:च्या पातळीवर निर्णय घेऊन जनावरांचे वाटप केले व त्यामध्ये पारदर्शकतेचा अभाव दिसून आला असून या प्रकरणी समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

उपरोक्त प्रकरणी सन २००५-०६ मध्ये झालेल्या अनियमिततेमुळे संबंधितांवर कारवाई होणे अपेक्षित असताना समितीने जिल्हा परिषदेला १६ ऑक्टोबर, २०१२ ला भेट दिल्यानंतर कारवाईस सुरुवात केली तसेच समितीने विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केल्यावर म्हणजेच तब्बल आठ महिन्यानंतर संबंधितांकडून दंड वसूल केला. या प्रकरणी लेखा

परिक्षणामध्ये मुद्दा आल्यावर संबंधितांना तात्काळ निलंबित करुन त्यांची विभागीय चौकशी होणे गरजेचे होते. तथापि, जिल्हा परिषदेने स्वत:हून कारवाई न करता समितीच्या निदेशांवर अवलंबून राहिली हा प्रकार निश्चितच खेदजनक असून यामध्ये जिल्हा परिषदेचा निष्काळजीपणे दिसून येतो. जिल्हा परिषदेला समितीने भेट दिली नसती तर वसुली झाली नसती त्यामुळे हा प्रकार गंभीर स्वरुपाचा असल्याचे समितीचे स्पष्ट मत झाले आहे. उक्त प्रकरणी साक्षीच्या वेळी कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा असे समितीने निदेश दिल्यावर त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली असतानाही अद्याप अहवाल सादर करण्यात आला नाही ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

**या प्रकरणी समितीने निदेश देऊनही समितीला अहवाल सादर न करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांना सक्त ताकीद देण्यात यावी तसेच उक्त प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी विहित मुदतीत पूर्ण करण्यात यावी व याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा. तसेच लेखा परिक्षकांकडून लेखा परिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखा आक्षेपात नमुद अनियमितता व त्यातील गुंतलेल्या रकमेबाबत तपासणी करुन कोणत्याही स्थितीत लेखा परिक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत आक्षेपित रक्कम वसुलीची कारवाई करणे आवश्यक असल्याबाबतचे आदेश शासनाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना द्यावेत अशी समितीची शिफारस आहे व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी.**

## जिल्हा परिषद ठाणे

### २.३.१ बांधकाम विभागाशी संबंधित प्रमाणक क्रमांक ३१२ दिनांक २३/०६/२००६ च्या अनुषंगाने झालेल्या प्रदानातील अपहाराबाबत :- परिच्छेद क्र. ४.४४

सन २००५-०६ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्र. ४.४४ मध्ये पंचायत समिती, मुरबाड यांनी बांधकाम विभागातील मैल कामगारांच्या देयकात
झालेल्या अपहाराबाबत संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत. पंचायत समिती, मुरबाड यांनी बांधकाम विभागातील मैल कामगाराचे माहे. फेब्रुवारीचे वेतन देयक रुपये २,६७,४३६ चा धनादेश क्रमांक ४९८९८२ दिनांक २३/०३/२००५ रुपये ५,५५,४५४ मध्ये समाविष्ट आहे.

१) सदर रकमेचे संवितरण दिनांक २५/०३/२००६ रोजी करण्यात येऊन नमुना क्रमांक ४ पेटी कॅशबुकामध्ये प्रत्यक्षात रुपये २,६७,००० चे प्रदान करुन एकूण परिगणना रुपये ३,६७,००० अशी दर्शवून नमुना ४ पेटी कॅशबूकात दिनांक २४/०३/२००६ रोजी सदर प्रदानातील रक्कम निरंक दर्शवून लेख्याबाहेर रुपये १,००,००० काढून अपहार केल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

२) कालांतराने सरदची बाब संबंधिताने एकुण परिगणनेमध्ये खाडाखोड करुन पुन्हा रक्कम रुपये १,००,००० लेख्यात दर्शविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. सदरच्या खाडाखोडी उपअभियंता, बांधकाम यांनी साक्षांकित केल्या नाहीत.

३) दिनांक ०१/०५/२००४ ते ७/०५/२००५ दिनांक १०/०५/२००५ ते २१/०६/२००६ दिनांक २२/०६/२००६ ते १४/०७/२००६ दिनांक १५/०५/२००६ ते पुढील कालावधीसाठी अशी एकुण ४ पेटी कॅशबुक उपयोगात आणल्याचे दिसून येते. दिनांक २२/०६/२००६ पासून पेटी कॅशबुक क्र ३ उघडण्यात येऊन सदर पेटी कॅशबुकात पृष्ठ क्रमांक १ ते ११ पर्यंत नोंदी घेण्यात येवून उर्वरित १२ ते ९८ पर्यतची कोरी सोडुन पेटी कॅशबुक क्रमांक ४, दिनांक ०१/०७/२००६ पासून नव्याने उघडण्यात आले. पंचायत समितीकडून प्राप्त झालेला व कार्यालयाकडून सिल करुन देण्यात आलेली रोखवही व त्यातील पृष्टे पूर्ण उपयोगात आणल्यानंतर नवीन रोखवही उघडणे आवश्यक आहे. बांधकाम विभागाने पहिली रोखवही अपूर्ण असताना दुसरी रोखवही उघडुन अपहारीत रक्कम कायमस्वरुपी शासन लेख्यापासून वेगळी केली आहे. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

४) दिनांक २४/०३/२००६ ते १४/०७/२००६ पर्यत वरील अपहारीत रक्कम संबधितानी खाडाखोडी करुन लेख्यात शिल्लक दर्शविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते उपअभियंता, बांधकाम यांनी वरील कालावधीतील कोणतीही खाडाखोड साक्षांकित केलेली नाही याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

५) दिनांक २२/०६/२००६ ते १४/०७/२००६ पर्यतच्या कालावधीसाठी एक नमुना ४ पेटी कॅशबुक उपयोगी आणून त्याची फक्त १ ते ११ पाने उपयोगात आणून पृष्ट क्रमांक ११ वर रुपये १,००,००० खाडाखोडीने दिनांक १४/०७/२००६ पर्यत दर्शविले आहेत. पेटी कॅशबुक दिनांक २२/०६/२००६ ते १४/०७/२००६ मधील १२ ते ९८ पृष्टे निरंक सोडण्याचे प्रयोजन स्पष्ट करणे आवश्यक आहे.

६) दिनांक १५/०७/२००६ रोजी नवीन पेटी कॅशबुक क्रमांक ४ मध्ये वरील खाडाखोडी शिल्लक दर्शविलेली रक्कम आरंभीची शिल्लक घेतल्याचे दिसून येत नाही. कारण दिनांक २४/०३/२००६ पासून सदरची रक्कम लेख्यात प्रत्यक्षात शिल्लक नव्हती लेखापरीक्षण कालावधीत बांधकाम विभागाच्या नमूना ४ पेटी कॅशबूकात असणाऱ्या रोख रक्कमेची पडताळणी करता दिनांक १४/०७/२००६ पर्यत खाडाखोडीने शिल्लक रक्कम प्रत्यक्ष रोकड पडताळणी वेळेस शिल्लक नसून पेटी कॅश बुकात प्रत्यक्ष रोकड निंरक दर्शविण्यात आली आहे. याचा अर्थ दिनांक २४/०३/२००६ पासून ते लेखापरीक्षण कालावधीत सदर रुपये १,००,००० लेख्याबाहेर काढून निर्देशित रकमेचा संबंधितांनी अपहार केल्याचे स्पष्ट होते.

७) वरील प्रकरणी जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता १९६८ चे नियम ५० मधील पोटकलम (२) अन्वये अपेक्षित कार्यवाही खातेप्रमुख बांधकाम विभाग यांनी केली नसल्याचे आढळून आले आहे. अशी कार्यवाही न केल्याने आर्थिक अपहार होण्यास वाव मिळतो. या अनियमिततेबाबत साधार खुलासा होणे आवश्यक आहे. पेटी कॅशबुक नमूना ४ मधील सविस्तर केलेल्या एकूण रक्कमाची परिगणना करुन ती व बरोबर असल्याचे नियंत्रण अधिकरी, खातेप्रमुख, बांधकाम विभाग यांनी दिवसा अखेर प्रमाणीत केल्याचे कोठेही संपुर्ण वित्तीय वर्षात आढळून आले नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.वरील प्रकरणी सर्व संबंधितावर लेखासंहिता, नियम ३६ नुसार कार्यवाही करुन,जबाबदारी निश्चित करुन अपहारीत रक्कम अनुज्ञेय व्याज दरासह वसूल करुन घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त अभिप्रायबाबत जिल्हा परिषदेने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण केले.

१) सदर प्रकरणामध्ये मैल कामगार यांचे फेब्रुवारी २००६ च्या वेतनातून लेख्याबाहेर रक्कम रु.१.०० लाखाचा अपहार झाला होता. सदरची रक्कम श्री. बर्डे, क.सहा(लेखा) यांचे कडुन वसुल करुन दि.०२.०९.२००६ अन्वये बँक खाते क्र.३३० मध्ये भरणा करण्यात आलेली आहे.

२) पेटी कॅश बुकातील खाडाखोडीबाबत उपअभियंता. मुरबाड यांचे निदर्शनास येताच संबधित श्री.बर्डे. कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यानां नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडुन सदर प्रकरणी चौकशी प्रस्तावित करण्यात आली व सदर चौकशीसाठी पेटी कॅशबुक चौकशी अधिकरी यांचेकडे जमा करण्यात आले.

३) दि.०१/०५/२००४ ते दि.०७/०५/२००५, दि.१०/०५/२००५ ते दि.२१/०६/२००६ ही दोन्ही पेटी कॅशबुक पूर्ण अनुक्रमे भरल्यानंतर नवीन कॅशबुक उपयोगात आणले आहे. तद्नंतर दि.२२/०६/२००६ रोजी नवीन पेटी कॅशबुक क्रमांक ३ वापरासाठी सुरुवात केली. त्यात पृष्ट क्र.१ ते ११ पर्यंतच्या वित्तीय नोंदी घेण्यात आल्या आहेत. दरम्यान, अपहाराची बाब निदर्शनास आली व सदर पेटी कॅशबुक क्रमांक ३ चौकशी अधिकारी यांचे कडे चौकशीसाठी जमा करुन घेतल्यामूळे पुढे वापरण्यात आले नाही. यापुढील उपविभागातील वित्तीय नोंदी घेणे बंद होऊ नये याकरीता नव्याने पेटी कॅशबुक क्रमांक ४ वापराकरीता घेण्यात आले. अपहार चौकशी करीता किती कालावधी लागेल याची कल्पना नसल्याने पुढील वित्तीय नोंदी नोंदविणे आवश्यक होते. सबब. नवीन पेटी कॅशबुक वापरण्यात आले.

४) सदर कालावधीतील खाडाखोडी उप अभियंता यांचे निदर्शनास आल्याने सदर बाबत त्यांनी संबंधित कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांचा खाडाखोडीबाबत खुलासा मागविला व त्यामूळे उप अभियंता यांनी सदर खाडाखोडी साक्षांकित केल्या नाहीत. कनिष्ठ सहायक लेखा यांचा सक्षम सदर खुलासा उप अभियंता यांनी सक्षम अधिकाऱ्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर केला.

५) दि. २२/०६/२००६ ते १४/०७/२००६ या कालावधीत पेटी कॅशबुक मधील पृष्ठ क्र.१ ते ११ पाने ही भरलेली असून पृष्ठ क्र.११ वर अपहार झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित श्री.बर्डे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांची चौकशी प्रस्तावित

करण्यात आली व पुराव्या दाखल सदर कॅशबुक सील करुन चौकशी अधिकारी यांचेकडे जमा करण्यात आले. सबब, पृष्ठ क्र.१२ ते ९८ ही पाने निरंक आहेत. व त्यामूळे पुढील कामकाजासाठी नवीन पेटी कॅशबुक उपयोगात आणले गेले.

६) सदर रक्कमेचा अपहार झाला होता सदर रक्कम रुपये १.०० लक्ष प्रत्यक्षात दिनांक ०२.०९.२००६ रोजी बँक खाते क्र.३३० मध्ये जमा केली आहे. तसेच, अपहार झाल्यानंतर दि.२२/०६/२००६ ते दि.१४/०७/२००६ पर्यंतचे पेटी कॅशबुक चौकशी अधिकारी यांचेकडे जमा करण्यात आल्याने पुढील उप विभागीय नोंदी करीता नवीन पेटी कॅशबुक दि. १५/०७/२००६ रोजी उघडण्यात आले. त्यामुळे नवीन पेटीकॅशबुक क्र.४ मध्ये शिल्लक दर्शविलेली रक्कम, आरंभिची शिल्लक घेता आली नाही.

७) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ५० मधील पोट कलम (२) अन्वये सक्षम अधिकारी, प्रत्यक्ष हाती असलेल्या रोख शिल्लकेशी किरकोळ रोखवहीत दाखवलेली रोख शिल्लक प्रत्येक महिन्याच्या कामाच्या शेवटच्या दिवशी पडताळून पाहिल आणि तशा आशयाचे प्रमाण पत्र नोंदवून ठेवील. तो परिषदेच्या जमा रक्कमा बँकेत त्वरीत भरण्याच्या बाबतीत आणि संवितरण झालेल्या निरनिराळ्या रकमा संबंधित पक्षकारांना संवितरीत करण्याच्या बाबतीत होत असलेल्या प्रगतीचा सुध्दा आढावा घेईल. अशा संवितरीत न झालेल्या रकमा तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ ठेवून घेण्यांत येणार नाहीत आणि या कालावधीनंतर त्या बँकेत पुन्हा जमा करण्यांत येतील, या बाबत दक्षता घेण्यांत येत आहे. याबाबत सर्व संबंधित उप अभियंता यांना उक्त नियमानुसार कार्यवाही करणेबाबत सुचना देणेत आलेल्या आहेत. सदर प्रकरणी अपहारीत रक्कम रु.१,००,०००/- वसूल करुन शासनाकडे जमा करणेत आली आहे. तसेच सदर प्रकरणात समाविष्ठ असलेले १) श्री. आर.एन.खांडेकर सहाय्यक लेखा अधिकारी २) श्री. के. एल. बर्डे कनिष्ठ सहाय्यक (लेखा) ३) श्री. डी.ए.कांबळे कनिष्ठ सहाय्यक (रोखपाल) यांना सेवेतुन निलंबित करणेंत येवुन त्यांची विभागीय चौकशी करणेत आली आहे. विभागीय चौकशी अंती वरीत पैकी अनुक्रमांक १ व ३ यांची आदेश क्र. जा.क्र.ठाजिप / अर्थ /आस्था /१/१६१/११ दि.१९.०७.२०११ व जा.क्र.ठाजिप /अर्थ / आस्था/१/१०८/११ दि. १९.०७.२०११ अन्वये पुढील वेतनवाढीवर परिणाम

करणारी एक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करणेंत आली आहे. तसेच वरील अ.क्र.२ श्री. के.एल.बर्डे. कनिष्ठ सहाय्यक (लेखा) बांधकाम, उपविभाग, मुरबाड हे सेवानिवृत्त झालेले असल्याने त्यांचे सेवानिवृत्ती वेतन रु. १००/- अधिक त्यावरील महागाई भत्ता आदेश क्र.जा.क्र.ठाजिप/अर्थ/आस्था/१/८७/११ दि. १६.०३.११ अन्वये काढून घेणेची शिक्षा त्यांना देणेत आली आहे. सदर प्रकरणातील अपहारीत करुन वसूल करुन संबंधिताविरुध्द जबाबदारी निश्चित कार्यवाही करणेत आली असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम ३६ नुसार कार्यवाही करणेत आली नाही.

**२.३.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अपहारीत रक्कम वसूल करण्यात आली आहे काय, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री.बर्डे, कनिष्ठ सहायक, लेखा हे सेवानिवृत्त झाले असून त्यांचेकडून वसूल करावयाची रक्कम त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातुन दरमहा १०० रुपयाप्रमाणे वसूल करण्यात येत आहे तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणांवर कार्यवाही केल्याचे समितीला सांगितले.

**२.३.३ उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१. पंचायत समिती मुरबाड येथील बांधकाम विभागातील मैल कामगारांच्या वेतन देयकाप्रकरणी अपहार केल्याने निलंबित केलेले व विभागीय चौकशी चालु असलेल्या अधिकाऱ्यांबाबतच्या प्रकरणी सद्य:स्थिती काय आहे ?

२. सन २००६ मध्ये अपहारीत केलेली रक्कम रु १ लाख केव्हा वसुल करण्यात आली. सदरची रक्कम व्याजासहित वसुल का करण्यात आली नाही ?

समितीच्या उपरोक्त मुद्यांबाबत विभागाकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली -

१. पंचायत समिती मुरबाड येथील बांधकाम विभागातील मैल कामगारांच्या वेतन देयकामधील अपहार प्रकरणी जबाबदार असलेल्या खालील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करुन त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी पूर्ण करणेत आली

आहे. विभागीय चौकशी अंती त्यांचे विरुध्द खालील प्रमाणे अंतिम कार्यवाही करणेत आलेली आहे.

अ) श्री.के.एल.बर्डे, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) - कार्या.आदेश क्र. ठाजिप/अर्थ/आस्था-१/८७/११ दि. १६.०३.११ अन्वये श्री.बर्डे सेवानिवृत झालेले असल्याकारणाने सेवानिवृती नंतर त्यांचे रु.१००/- सेवानिवृती वेतन अधिक त्यावरील महागाई भत्ता कायमस्वरुपी बंद करणेत आलेला आहे.परंतू श्री.बर्डे यांनी मा.अप्पर आयुक्त कोकण विभाग यांचेकडे सदर शिक्षेविरुध्द अपिल केले असल्याने अपिलांती झालेला निर्णयानुसार मा.अप्पर आयुक्त कोकण विभाग यांचे दि.०६.०८.२०११ च्या आदेशान्वये वरील प्रमाणे केलेली शिक्षा तीन वर्षांसाठी करणेत आलेली आहे.

ब) श्री.डी.अे.कांबळे. कनिष्ठ सहाय्यक - आदेश क्र.ठाजिप/अर्थ/आस्था-०१/१०८/११/ दि. १९.०७.२०११ अन्वये एक वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम करणारी म्हणून बंद करणेत आलेली आहे.

क) श्री.आर.एन.खांडेकर, सहाय्यक लेखा अधिकारी - आदेश क्र.ठाजिप/अर्थ/आस्था-१/१६१/११ दि.१९.०७.२०११ अन्वये एक वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम करणारी म्हणून बंद करणेत आलेली आहे.

२. दि. २३ मार्च २००६ रोजी अपहारित झालेली रक्कम रुपये एक लक्ष दि. २/९/२००६ रोजी चलनाने भरणा करुन वसूल करणेत आलेली आहे. सदर प्रकरणी व्याजासह वसुली झाली नसली तरी प्रत्यक्षात उपरोक्त प्रमाणे सर्व सबंधितांविरुध्द विभागीय चौकशी पूर्ण करुन शिक्षा करणेत आली आहे.

### २.३.४ विभागीय सचिवांची साक्ष -

विभागाकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने दिनांक १२ नोव्हेंबर, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शासकीय निधीचा अपहार केल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय, यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, या प्रकरणी अपहारित सर्व रक्कम वसूल झालेली आहे. शासकीय सेवा नियमानुसार सर्वप्रथम दोषी अधिकारी, कर्मचारी यांना निलंबित केले जाते व त्यांच्याविरुद्ध

विभागीय चौकशी केली जाते. त्यानंतर विभागीय चौकशी अहवालाच्या आधारे शिक्षा दिली जाते. या प्रकरणी ही सर्व कार्यवाही होऊन संबंधितांना शिक्षाही झालेली आहे. मात्र, त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केल्याचे दिसून येत नाही. तसेच मुख्य कर्मचारी अधिकारी यांनी असे सांगितले की, या प्रकरणी १ लाख रुपयांचा अपहार झाला होता. यामधील सर्व रक्कम दिनांक २/०९/२००६ रोजी वसूल करण्यात आली आहे. या प्रकरणी तीन कर्मचारी दोषी होते व त्यांची चौकशी होउुन त्यांना शिक्षाही झालेली आहे. श्री.के.एल.बर्डे हे वरिष्ठ सहय्यक (लेखा) या पदावर कार्यरत होते. ते सेवानिवृत्त झाले ओहत. सेवानिवृत्ती वेतनाच्या मूळ वेतनात १०० रुपये व त्यावरील महागाई भत्ता कायमचा बंद करण्याची शिक्षा करण्याची शिक्षा त्यांना देण्यात आली आहे.

यावर समितीने अशीही विचारणा केली की, गैरव्यवहाराप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करणे गरजेचे असताना या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालण्यासाठी तत्कालीन वरीष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली नाही त्यामुळे त्यांनतर जबाबदार धरुन अपहारीत रक्कम दंडासहित वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली. तसेच श्री.के.एस.बर्डे कनिष्ठ सहायक यांनी आयुक्तांकडे अपिल करून कायमस्वरूपी १०० रुपये निधी वेतन रोखण्याची शिक्षा तीन वर्षाची करण्यात आली त्यामुळे शासनाने त्यांचे विरुद्ध का अपिल करण्यात आले नाही यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे सांगितले की,

अपहारित १ लाख रुपयांची संपूर्ण वसुली झाली आहे. शिक्षा म्हणून संबंधित कर्मचारी हयात असेपर्यंत त्यांना सेवानिवृत्ती वेतनातून आणि त्यानंतर कुटुंबाला मिळणाऱ्या कुटुंब निवृत्ती वेतनातून १०० रुपये कायम स्वरुपी कमी मिळणार आहेत. या माध्यमातून फार मोठ्या आर्थिक नुकसानीची शिक्षा संबंधितास मिळाली आहे. अन्य, कर्मचारी सर्वश्री डी.अे.कांबळे व आर.एन.खांडेकर यांना पुढील वेतनवाढीवर परिणाम करणारी एक वार्षिक वेतनवाढ रोखण्याची शिक्षा देण्यात आली आहे. या माध्यमातूनही फार मोठी रक्कम वसूल होणार आहे. तर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी असे सांगितले की, या प्रकरणी २.६७ लाख रुपयांचे देयक मंजूर झाले असताना ३.६७ लाख रुपयांचा धनादेश काढण्यात आला. ही बाब लक्षात आल्यानंतरही संबंधितांनी त्या रकमेची शासनास प्रतिपूर्ती केली नाही. त्यानंतर झालेल्या लेखापरीक्षणात ही बाब निदर्शनास आली. ही अनियमितता उपअभियंता स्तरावर घडली आहे. ही बाब निदर्शनास आल्यानंतर सर्व संबंधितांना शासन ज्ञापन देण्यात आले व त्यानंतर सप्टेंबर, २००६ मध्ये त्यांनी

चलनाने या रकमेचा भरणा केला. त्यानंतर संबंधितांविरुद्ध विभागीय चौकशी करण्यात आली व त्यानुसार शिक्षाही देण्यात आली आहे.

उपरोक्त प्रकरणी संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस असे सांगितले की, २.६७ लक्ष रुपयांऐवजी ३.६७ लक्ष रुपयांचा धनादेश काढण्यात आला आहे. संबंधितांनी दिनांक २४/०३/२००६ ते दिनांक ०२/०९/२००६ या कालावधीत १ लाख रुपयांचे टेंपररी मिसॲप्रोप्रिएशन केले आहे. त्यावेळी त्यांनी पेटी कॅश बुक पूर्णपणे भरण्याएवजी कॅश बुकची केवळ १२ पृष्ठेच नोंदविली आणि हा अपहार दडविण्यासाठी कॅश बुकची उर्वरित पृष्ठे तशी कोरी सोडून दिली व नवीन पेटी कॅश बुक तयार केले. अशा प्रकारे त्यांनी ३ कॅश बुक तयार केली. या प्रकरणातील अपहारित रक्कम पूर्णपणे वसूल झाली आहे. अपहार केलेल्या कर्मचाऱ्यांना नियमानुसार शिक्षाही झाली आहे. यामधील रक्कम लेख्यात परत आली आहे. तर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, काही प्रकरणात अपहार झाल्यानंतर संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी यांना मेमो दिला जातो व अपहारित रक्कम भरण्याविषयी कळविले जाते. याप्रमाणे जे अधिकारी, कर्मचारी ही रक्कम भरतात, त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केला जात नाही. तथापि, रक्कम भरली नाही तर फौजदारी गुन्हा दाखल केला जातो.

उपरोक्त प्रकरणी संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करणे आवश्यक होते किंवा नाही हि बाब तपासून आपला स्वयंस्पष्ट अभिप्राय विभागीय सचिवांनी समितीला सादर करावा असे समितीने निदेश दिल्यावर विभागीय सचिवांनी त्यास होय असे उत्तर दिले.

**२.३.५ अभिप्राय व शिफारशी -**

ठाणे जिल्हा परिषदेतील मुरबाड पंचायत समिती अंतर्गत मैल कामगारांचे महिन्याचे वेतन देयक अदा करण्याप्रकरणी क्रमांक ४ पेटी कॅशबुकमध्ये प्रत्यक्षात रुपये २,६७,०००/- प्रदान करुन एकूण परिगणना रुपये ३,६७,०००/- अशी दर्शवून नमूद ४ पेटीकॅश बुकात सदर प्रदानातील रक्कम निरंक दर्शवून लेख्याबाहेर रुपये १,००,०००/- काढून अपहार करण्यात आला आहे. सदरचा अपहार दिनांक २५/०३/२००६ रोजी करण्यात आला असून सदरची बुक रक्कम पुन्हा दिनांक ०२/०९/२००६ रोजी बँकेत भरणा केली आहे. यामध्ये सहा महिन्याचा कालावधी गेला असून रक्कमेचा अपहार झाल्यावर तात्काळ संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम ३६ नुसार कारवाई करणे आवश्यक होते तथापि तसे न करता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विभागीय चौकशी करून प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे. यावरुन वरिष्ठ आधिकाऱ्यांनी संबंधितांना पाठीशी घातले असल्याचे

समितीचे स्पष्ट मत झाले आहे. ज्यावेळी अपहार करण्यात आला त्यावेळी सदरहू धनादेश जादा रक्कमेचा असल्याची बाब संबंधित यंत्रणेच्या नजरेस येणे आवश्यक होते. तथापि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे हेतूपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येते त्यामुळे वरिष्ठ अधिकारीसुद्धा या घटनेस तेवढेच जबाबदार आहेत.

एक कोटीचा अपहार झाला असताना अशाच प्रकारे कारवाई करण्यात आली असती का अशी समितीने विचारणा केल्यावर त्याबाबतचे उत्तर समितीला मिळू शकले नाही. या प्रकरणी समितीने नाराजी व्यक्त केली असून संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करणे आवश्यक होते असे समितीचे स्पष्ट मत झाले आहे. संबंधितांनी पेटी कॅशबुक पूर्ण भरण्या ऐवजी कॅशबुकची फक्त १२ पृष्टे नोंदविली आणि अपहार दडविण्यासाठी उर्वरित पृष्ठे कोरी सोडून नविन कॅशबुक तयार केले अशा प्रकारे तीन कॅशबुक तयार करण्यात आली असून सदरचा अपहार हेतुपूर्वक करण्यात आला असल्याचे समितीचे स्पष्टमत झाले आहे.

**समिती अशी शिफारस करते की, अपहार होतेवेळी संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करुन पाठीशी घातल्याप्रकरणी त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी. तसेच अपहार करणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल होतो किंवा कसे हि बाब तपासून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच मा.आयुक्त यांचे पातळीवर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची शिक्षा तीन वर्षाची कोणत्या आधारावर करण्यात आली याचीही चौकशी करण्यात यावी व त्यानुसार संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा.**

**तसेच ज्या प्रकरणात प्रत्यक्षपणे व हेतुपूर्वक अपहार केल्याचे निदर्शनास येते अशा प्रकरणामध्ये कोणत्याही स्थितीत अपहारास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना पारदर्शक व स्वच्छ प्रशासनाच्या दृष्टीने प्रशासनाने पाठिशी घालू नये तसेच अपहारास चालना मिळेल असे कोणतेही कृत्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करु नये. अपहार उघड झाल्याबरोबर संबंधित अपहारास जबाबदार असलेले अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून संपूर्ण् अपहारीत रक्कमेच्या वसुली बरोबरच त्वरित फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत कार्यवाही करण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करावा. त्याचप्रमाणे अपहारात सिध्द झालेल्या रक्कमेसंदर्भात विभागीय चौकशी विहित मुदतीत तातडीने पूर्ण करुन संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबचे आदेश शासनाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना निर्गमित करावेत अशीही समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत

**बुधवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०१२**

**स्थळ : जिल्हा परिषद, सभागृह, गडचिरोली**

<u>**उपस्थिती**</u>

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.

३) श्री.विजय खडसे, वि.स.स.

४) श्री. बापूसाहेब पाठारे, वि.स.स.

५) श्री.दादाराव केचे, वि.स.स.

६) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

७) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

८) श्री.संजय राठोड, वि.स.स.

९) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

**<u>निमंत्रित</u>**

१०) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>**

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

श्री.शशिकांत साळुंखे, कक्ष अधिकारी

**<u>स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचे कार्यालय</u>**

श्री.के.एम.विधाते, संचालक

**जिल्हा परिषद, गडचिरोली**

१) श्री.किरण गणेश कोवे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी

२) श्री.विजय सु.कोळेकर, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी

३) डॉ.एफ.ए.मेश्राम, जिल्हा आरोग्य अधिकारी

४) डॉ.आशा गेडाम, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

५) श्री.सी.ए. पुद्दटवार, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण)

६) श्री.रा.सो.महाले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

७) श्रीमती पी.एम.आत्राम, समाज कल्याण अधिकारी

८) श्री.शामराव पा.कुंभार, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

९) श्री.सुधाकर खंगार, प्रभारी कार्यकारी अभियंता (सिंचन)

१०) श्री.बी.एन.राजनहिरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक व निनंतर)

११) श्री.शिवशंकर भारसाकळे, प्रभारी प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा

१२) श्री.एस.आर.हळदे, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु)

१३) श्री.एस.वाय.वाघ, कार्यकारी अधिकारी (एमजेपी)

१४) श्री.व्ही.एस.महाजन, मोहिम अधिकारी (कृषी)

१५) श्री.दिपक नंदकुमार शिंदे, वरिष्ठ लेखा अधिकारी (वित्त विभाग)

१६) श्री.एन.आर.यिंतावार, उप अभियंता, पीएमजीएसवाय.

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने गडचिरोली जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील गडचिरोली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक ३० ऑगस्ट, २०१२**
**स्थळ : जिल्हा परिषद, गडचिरोली**

**उपस्थिती**

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३) श्री.विजयराव खडसे, वि.स.स.

४) श्री.दादाराव केचे, वि.स.स.

५) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

६) श्री.विष्णू सवरा, वि.स.स.

७) श्री.संजय राठोड, वि.स.स.

८) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

**जिल्हा परिषदेचे अधिकारी :-**

श्री.किरण कोवे, प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.एस.के.खंगार, प्रभारी कार्यकारी अभियंता (सिंचन)

डॉ.ए.आर.गेडाम, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

डॉ.एफ.ए.मेश्राम, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री.बी.एम.राजनहिरे, प्र.शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक व निरंतर)

**पंचायत समिती, आरमोरी :-**

श्री.आर.डी.निखाडे, गट विकास अधिकारी

श्री.एस.पी.कांबळे, प्रकल्प अधिकारी (एकात्मिक बालविकास योजना)

श्री.पी.पी.गणवीर, गट शिक्षणाधिकारी

डॉ.सुनील एल.मांडवी, तालुका वैद्यकीय अधिकारी

श्री.सावसागडे, विस्तार अधिकारी (पं.)

व इतर शाखा अभियंता, विस्तार अधिकारी व संबंधित अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने गडचिरोली जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील गडचिरोली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१२**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, गडचिरोली**

**उपस्थिती :**

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३) श्री.विजयराव खडसे, वि.स.स.

४) श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

५) श्री.दादाराव केचे, वि.स.स.

६) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

७) श्री.विष्णू सवरा, वि.स.स.

८) श्री.संजय राठोड, वि.स.स.

९) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित**

१०) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री.शशिकांत साळुंखे, कक्ष अधिकारी

**संचालक, (स्थानिक निधी लेखा) यांचे कार्यालय**

श्री.एम.के.विधाते, संचालक

**पंचायत समिती, भामरागड**

श्री.ए.एम.इल्लुरकर, प्रभारी गट विकास अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी

श्री.पी.एम.सहारे, गट शिक्षणाधिकारी

श्री.पी.आर.केळकर, उप अभियंता

डॉ.एल.आर.कुकडे, तालुका आरोग्य अधिकारी व संबंधित शाखा अभियंता व विस्तार अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने गडचिरोली जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील गडचिरोली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

## मंगळवार, दिनांक ९ जुलै, २०१३
## स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)

**उपस्थिती**

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.

३) श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४) श्री.विजय खडसे, वि.स.स.

५) श्री.भाऊसाहेब कांबळे , वि.स.स.

६) श्री.दादाराव केचे, वि.स.स.

७) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

८) श्री.संजय जाधव, वि.स.स.

९) श्री.संजय राठोड, वि.स.स.

१०) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.

११) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

१२) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

१३) श्री.दिवाकर रावते,वि.प.स.

१४) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>**

श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

**<u>स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचे कार्यालय</u>**

श्री.के.एम.विधाते, संचालक

**<u>विभागीय प्रतिनिधी :</u>**

१) श्री.एस.एस.संधू, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग
२) श्री.उज्जव ऊके, प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग
३) श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग (रोहयो)
४) श्री.रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गडचिरोली
५) श्री.एस.बी.पेजलवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गडचिरोली
६) श्री.दि.ग.मोरे, सह सचिव, ग्राम विकास विभाग
७) श्री.ना.उ.रौराळे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग
८) श्री.गिरीष भालेराव, सह संचालक (रा.ग्र.आ.अ.) सार्वजनिक आरोग्य विभाग
९) श्री.एस.व्ही.देशपांडे, सह संचालक (अभियांत्रिकी) जीएसडीए, पुणे
१०) श्री.एस.पी.कुंभार, कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.गडचिरोली
११) श्री. रामचंद्र श.जाधव, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
१२) श्री.गो.ग.आल्हाट, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग

<u>संक्षिप्त कार्यवृत्त :</u>

सन २००४-२००५ च्या लेख्ां परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात गडचिरोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग, प्रधान सचिव जलसंधारण (रोहयो) विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली, सह सचिव, ग्रामविकास विभाग, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग, सह संचालक (रा.ग्र.आ.अ.) सार्वजनिक आरोग्य विभाग, सह संचालक ( अभियांत्रिकी) जी.एस.डी.ए. पुणे, एस.पी. कुभांर, कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प. गडचिरोली, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उपसचिव, सामाजिक न्याय विभाग, यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १० जुलै, २०१३**

## स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)

**उपस्थिती**

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
३) श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४) श्री.विजय खडसे, वि.स.स.
५) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
६) श्री.भारत भालके, वि.स.स.
७) श्री.बापुसाहेब पाठारे, वि.स.स.
८) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
९) श्री.संजय जाधव, वि.स.स.
१०) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
११) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
१२) श्री.दिवाकर रावते,वि.प.स.
१३) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचे कार्यालय**
श्री.के.एम.विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी :**

१) श्री.एस.एस.संधू, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग
२) श्री.रा.शं.जाधव, उप सचिव

**जिल्हा परिषद, गडचिरोली :-**

१) श्री.रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी
२) श्री.द.चि.सुर्यवंशी, मुख्य अधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी (पा.पु.व स्व.)
३) श्री.श्री.वि.देशपांडे, सह संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
४) श्री.वि.दी.भालेराव, सह संचालक, रा.ग्रा.आ.अ.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००४-२००५ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या गडचिरोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा, परिषद गडचिरोली मुख्य अधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी (पा.पु.व स्व.)सह संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सह संचालक, रा.ग्रा.आ.अ. यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२**

**स्थळ : जिल्हा परिषदेच्या आण्णासाहेब वर्तक सभागृह, ठाणे**

**उपस्थिती**

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
३) श्री.वैजनाथ शिंदे वि.स.स.
४) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५) श्री.विजय खडसे, वि.स.स.
६) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७) श्री.उदय सामंत वि.स.स.
८) श्री.सुरेश लाड, वि.स.स.
९) श्री.बापूसाहेब पाठारे, वि.स.स.
१०) श्री.अण्णा बनसोडे, वि.स.स.
११) श्री.दादाराव केचे, वि.स.स.
१२) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
१३) श्री.जयकुमार रावल, वि.स.स.
१४) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
१५) श्री.संजय राठोड, वि.स.स.
१६) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१७) श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.
१८) डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.
१९) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२०) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**निमंत्रित**

२१) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.जी.डी.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री.राजेंद्र गेंगले, अवर सचिव

**संचालक स्थानिक निधी (लेखा) यांचे कार्यालय**

श्री.के.एम.विधाते, संचालक

**जिल्हा परिषद, ठाणे**

१. श्री.किरण कुरुंदकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. श्री.रवींद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
३. श्री.अंकुश बगाटे, प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं.)
४. श्री.संजय पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
५. श्री.दत्तात्रय मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
६. श्री.मधुकर वायंगणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)
७. डॉ.श्रीमती सुचरीता थोरात-गागरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
८. श्री.आर.एफ.नाईकवाडी, जिल्हा अधिक्षक, कृषी
९. श्री.अशोक मिसाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) (प्रभारी)
१०. डॉ.रावजी कदम, जिल्हा आरोग्य अधिकारी
११. श्रीमती रुपा राऊळ-गिरासे, कार्यकारी अभियंता बांधकाम (पश्चिम)
१२. श्री.सुभाष घाडगे, कृषी विकास अधिकारी
१३. श्रीमती सलीमा तडवी, समाज कल्याण अधिकारी
१४. श्री.सुभाष पाटील, उप शिक्षणाधिकारी, सर्व शिक्षा अभियान (प्रभारी)
१५. श्री.टी.ओ.चव्हाण, गट विकास अधिकारी, कल्याण
१६. श्री.अशोक पाटील, गट विकास अधिकारी, भिवंडी,
१७. श्री.आर.ए.अवचार, गट विकास अधिकारी,मुरबाड (प्रभारी)
१८. श्रीमती एन.एस.आप्रे, गट विकास अधिकारी, पालघर
१९. श्री.यु.जे.आसवले, गट विकास अधिकारी, डहाणू
२०. श्रीमती के.डी.जुईलकर, गट विकास अधिकारी, शहापूर
२१. श्री.ए.व्ही.धुळे, गट विकास अधिकारी, वसई
२२. श्री.राहूल धूम, गट विकास अधिकारी, वाडा
२३. श्री.गणेश पिंपळे, गट विकास अधिकारी, विक्रमगड
२४. श्री.एन.पी.ओसवाल, गट विकास अधिकारी, तलासरी
२५. श्री.प्रमोद गोडांबे, गट विकास अधिकारी,अंबरनाथ
२६. श्री.एस.एस.भोये, बालविकास प्रकल्प अधिकारी, अंबरनाथ

<u>संक्षिप्त कार्यवृत्त :</u>

समितीने ठाणे जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील ठाणे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह (आण्णासाहेब वर्तक सभागृह) ठाणे**

**उपस्थिती**

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
३) श्री.वैजनाथ शिंदे वि.स.स.
४) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५) श्री.विजय खडसे, वि.स.स.
६) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७) श्री.सुरेश लाड, वि.स.स.
८) श्री.बापूसाहेब पाठारे, वि.स.स.
९) श्री.दादाराव केचे, वि.स.स.
१०) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
११) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
१२) श्री.संजय राठोड, वि.स.स.
१३) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१४) श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.
१५) डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.
१६) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
१७) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**निमंत्रित**

१८) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.जी.डी.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**
श्री.राजेंद्र गेंगले, अवर सचिव

**संचालक स्थानिक निधी (लेखा) यांचे कार्यालय**
श्री.के.एम.विधाते, संचालक

**<u>जिल्हा परिषद, ठाणे</u>**

१. श्री.किरण कुरुंदकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. श्री.रवींद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
३. श्री.अंकुश बगाटे, प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं.)
४. श्री.संजय पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
५. श्री.दत्तात्रय मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
६. श्री.मधुकर वायंगणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)
७. डॉ.श्रीमती सुचरीता थोरात-गागरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
८. श्री.आर.एफ.नाईकवाडी, जिल्हा अधिक्षक, कृषी
९. श्री.अशोक मिसाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) (प्रभारी)
१०. डॉ.रावजी कदम, जिल्हा आरोग्य अधिकारी
११. श्रीमती रुपा राऊळ-गिरासे, कार्यकारी अभियंता बांधकाम (पश्चिम)
१२. श्री.सुभाष घाडगे, कृषी विकास अधिकारी
१३. श्रीमती सलीमा तडवी, समाज कल्याण अधिकारी
१४. श्री.सुभाष पाटील, उप शिक्षणाधिकारी, सर्व शिक्षा अभियान (प्रभारी)
१५. श्री.टी.ओ.चव्हाण, गट विकास अधिकारी, कल्याण
१६. श्री.अशोक पाटील, गट विकास अधिकारी, भिवंडी,
१७. आर.ए.अवचार, गट विकास अधिकारी,मुरबाड (प्रभारी)
१८. श्रीमती एन.एस.आप्रे, गट विकास अधिकारी, पालघर
१९. श्री.यु.जे.आसवले, गट विकास अधिकारी, डहाणू
२०. श्रीमती के.डी.जुईलकर, गट विकास अधिकारी, शहापूर
२१. श्री.ए.व्ही.धुळे, गट विकास अधिकारी, वसई
२२. श्री.राहूल धूम, गट विकास अधिकारी, वाडा
२३. श्री.गणेश पिंपळे गट विकास अधिकारी, विक्रमगड
२४. श्री.एन.पी.ओसवाल गट विकास अधिकारी, तलासरी
२५. श्री.प्रमोद गोडांबे, गट विकास अधिकारी,अंबरनाथ
२६. श्री.एस.एस.भोये, बालविकास प्रकल्प अधिकारी, अंबरनाथ

<u>संक्षिप्त कार्यवृत्त :</u>

समितीने ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील ठाणे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

## गुरुवार, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१२

## स्थळ : जिल्हा परिषदेच्या आण्णासाहेब वर्तक सभागृह, ठाणे

**उपस्थिती**

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
३) श्री.वैजनाथ शिंदे वि.स.स.
४) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५) श्री.विजय खडसे, वि.स.स.
६) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७) श्री.उदय सामंत वि.स.स.
८) श्री.सुरेश लाड, वि.स.स.
९) श्री.बापूसाहेब पाठारे, वि.स.स.
१०) श्री.अण्णा बनसोडे, वि.स.स.
११) श्री.दादाराव केचे, वि.स.स.
१२) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
१३) श्री.जयकुमार रावल, वि.स.स.
१४) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
१५) श्री.संजय राठोड, वि.स.स.
१६) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१७) श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.
१८) डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.
१९) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२०) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**निमंत्रित**

२१) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.जी.डी.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**
श्री.राजेंद्र गेंगले, अवर सचिव

**पंचायत समिती, भिवंडी**

१) श्री.रवींद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे

२) श्री.अशोक पाटील, गट विकास अधिकारी

३) श्री.डी.एस.पवार, कार्यकारी अभियंता

४) श्री.वि.एम.देवराज, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे

५) श्री.आर.डी.चव्हाण, उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

६) श्री.एम.के.शहा, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा

७) श्री.आर.वि.प्रभाकर, उप विभागीय अधिकारी, पाटबंधारे

८) श्री.शिरसाठ, सिडीपीओ

९) डॉ.प्रवीण रसाळ, ता. आरोग्य अधिकारी

१०) सौ.कुंदा सुधाकर पाटील, प्रभारी गट विकास अधिकारी

११) श्री.ए.डी.दोडके, कृषी अधिकारी

१२) श्री.एन.व्ही.भोये, उप अभियंता, बांधकाम

१३) श्री.गिते, शाखा अभियंता, बांधकाम

१४) श्री.एम.एस.बोंडे, बा.वि.प्र.अं.

१५) श्री. के.एस. साळवे, क.ले.अ.

१६) डॉ.एस.एस.सिंह, प.वि.अ. (वि.)

१७) श्री.आर.एस.नाळे, उप अभियंता

१८) श्री.दिपक कुटे, जिल्हा कृषी अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील ठाणे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक १९ ऑक्टोबर, २०१२**

**स्थळ : जिल्हा परिषदेच्या आण्णासाहेब वर्तक सभागृह, ठाणे**

**<u>उपस्थिती</u>**

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
३) श्री.विजय खडसे, वि.स.स.
४) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
५) श्री.बापूसाहेब पाठारे, वि.स.स.
६) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
७) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
८) श्री.संजय राठोड, वि.स.स.
९) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१०) श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.
११) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
१२) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**निमंत्रित**

१३) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>**

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.जी.डी.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**<u>ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई</u>**

श्री.राजेंद्र गेंगले, अवर सचिव

**<u>संचालक स्थानिक निधी (लेखा) यांचे कार्यालय</u>**

श्री.के.एम.विधाते, संचालक

**<u>जिल्हा परिषद, ठाणे</u>**

१. श्री.किरण कुरुंदकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. श्री.रवींद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
३. श्री.अंकुश बगाटे, प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं.)
४. श्री.संजय पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

५. श्री.दत्तात्रय मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
६. श्री.मधुकर वायंगणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)
७. डॉ.श्रीमती सुचरीता थोरात-गागरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
८. श्री.आर.एफ.नाईकवाडी, जिल्हा अधिक्षक, कृषी
९. श्री.अशोक मिसाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) (प्रभारी)
१०. डॉ.रावजी कदम, जिल्हा आरोग्य अधिकारी
११. श्रीमती रुपा राऊळ-गिरासे, कार्यकारी अभियंता बांधकाम (पश्चिम)
१२. श्री.सुभाष घाडगे, कृषी विकास अधिकारी
१३. श्रीमती सलीमा तडवी, समाज कल्याण अधिकारी
१४. श्री.सुभाष पाटील, उप शिक्षणाधिकारी, सर्व शिक्षा अभियान (प्रभारी)
१५. श्री.टी.ओ.चव्हाण, गट विकास अधिकारी, कल्याण
१६. श्री.अशोक पाटील, गट विकास अधिकारी, भिवंडी,
१७. आर.ए.अवचार, गट विकास अधिकारी,मुरबाड (प्रभारी)
१८. श्रीमती एन.एस.आप्रे, गट विकास अधिकारी, पालघर
१९. श्री.यु.जे.आसवले, गट विकास अधिकारी, डहाणू
२०. श्रीमती के.डी.जुईलकर, गट विकास अधिकारी, शहापूर
२१. श्री.ए.व्ही.धुळे, गट विकास अधिकारी, वसई
२२. श्री.राहूल धूम, गट विकास अधिकारी, वाडा
२३. श्री.गणेश पिंपळे, गट विकास अधिकारी, विक्रमगड
२४. श्री.एन.पी.ओसवाल, गट विकास अधिकारी, तलासरी
२५. श्री.प्रमोद गोडांबे, गट विकास अधिकारी,अंबरनाथ
२६. श्री.एस.ए.भोये, बालविकास प्रकल्प अधिकारी, अंबरनाथ

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील ठाणे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २६ जून, २०१३**

**स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)**

**उपस्थिती**

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.

३) श्री.सुरेशभाऊ कांबळे, वि.स.स.
४) श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
५) श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.
६) श्री.दादाराव केचे, वि.स.स.
७) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
८) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
९) श्री.संजय जाधव, वि.स.स.
१०) श्रभ्.संजय राठोड, वि.स.स.
११) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१२) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
१३) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित**

१४) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव

**स्थानिक निधी लेखा परिक्षण**

१) श्री.के.एम.विधाते, संचालक

**ठाणे जिल्हा परिषद :-**

१. श्री.शेखर गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. श्री.रविंद्र शिंदे, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी
३. श्री.संजय पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

**विभागीय प्रतिनिधी**

१) श्री.टी.सी.बेजामीन, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
२) श्री.स्वाधिन क्षेत्रिय, अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल विभाग,
३) डॉ.सुधीर गोयल, अपर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग (कृषी व पणन)
४) श्री.एस.एस.संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग

५) श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास पचांयती राज) विभाग

६) श्री.उज्जवल उके, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग

७) श्री. प्रवीण परदेशी, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग

८) श्री. एस.के.मुखर्जी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

९) श्री. द.चि.सुर्यवंशी, मुख्य अधिकारी तथा विकास कार्य अधिकारी

१०) डॉ. मल्लिनाथ कळशेट्टी, उप सचिव, ग्राम विकास विभाग

११) श्री. ना.ना.रौराळे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००५-०६ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल विभाग, अप्पर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास ( पंचायत राज) विभाग, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्य अधिकारी तथा विकास कार्य अधिकारी उप सचिव, ग्रामविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २७ जून, २०१३,**
**स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)**

**उपस्थिती**

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
३) श्री.सुरेशभाऊ कांबळे, वि.स.स.
४) श्री.भारत भालके, वि.स.स.
५) श्री.दादाराव केचे, वि.स.स.
६) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
७) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
८) श्री.संजय जाधव, वि.स.स.

९) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१०) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
११) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
१२) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
१३) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**विभागीय प्रतिनिधी**

१) श्री.एस.एस.संधू प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग,

२) श्री.आर.डी.शिंदे, सचिव, सामाजिक न्याय विभाग,

३) श्री.अनिल डिग्गीकर, सचिव, कृषी व पदुम विभाग

४) श्री.नाना रौराळे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

५) श्री.शेखर गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे

६) श्री.रविंद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे

७) श्री.सं.प्र.पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे

८) श्री.अशोक पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं) जिल्हा परिषद, ठाणे

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००५-२००६ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात ठाणे जिलहा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभ्ंाग, सचिव कृषी व पदुम विभ्ंाग सह सचिव, शालेय शिक्षण विभ्ंाग मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. ठाणे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. ठाणे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प. ठाणे तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी (प) जि.प. ठाणे यांची साक्ष घेतली.

## मंगळवार, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१३

## स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)

**उपस्थिती**

१. श्री.जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.विजयराव खडसे, वि.स.स.

४. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

५. श्री.संजय भेगडे, वि.स.स.

६. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.

७. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

१०. श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.

११. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, उप सचिव

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव,

**स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई**

श्री.के.एम.विधाते, संचालक

**शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री.ज.स.सहारिया, अतिरिक्त मुख्य सचिव

श्री.रा.रा.रौराळे, सह सचिव

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री.एस.एस.संधू, प्रधान सचिव

श्री.एकनाथ मोरे, उप सचिव

डॉ.मल्लिनाथ कलशेटट्टी, उप सचिव

श्री.न.म.शिंदे, उप सचिव

**जिल्हा परिषद, ठाणे**

श्री.रविंद्र पाटील, मुख्य/अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.अशोक पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.एस.पी.पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्रीमती रुपा राऊळ-गिरासे, कार्यकारी अभियंता, जि.प.ठाणे

श्री.पी.एल.कवाते, शिक्षणाधिकारी

श्रीमती सलीमा तडवी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

**<u>संक्षिप्त कार्यवृत्त :</u>**

सन २००५-२००६ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव,ग्रामविकास विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. ठाणे, उप मुख्य कार्यक्‍ारी अधिक्‍ारी, जि.प. ठाणे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प. ठाणे कार्यकारी अभियंता, जि.प. ठाणे, शिक्षणाधिकारी जि.प. ठाणे व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प. ठाणे यांची साक्ष घेतली.

**सोमवार, दिनांक १६ डिसेंबर, २०१३**
**स्थळ विधान भवन, नागपूर.**

**समिती प्रमुख**

१. श्री.जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.भारत भालके, वि.स.स.

६. श्री. भिमराव तापकीर वि.स.स.

७. श्री. राजकुमार बडोले वि.स.स.

८. श्री.राजाराम ओझरे, वि.स.स

९. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित**

१०. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>**

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव

श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

श्री.दिनकर कांबळे, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत पंधराव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणांसह संमत करण्यात आला.